रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ४१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

विनापरवाना इमारत उभारून फसवणूक/३
रेवदंड्यात पाईपलाईन फुटून पाणी वाया/५
कोलंबो कसोटीत भारताचा श्रीलंकेवर फॉलऑन/८

### सणासुदीतही एफडीए परवान्यासह नियम पाळणे आवश्यक



**मुंबई** : गणेशोत्सव असो, ईद किंवा अन्य सण, महाप्रसाद करणाऱ्या आयोजकांनीही अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) नियमांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. सण-उत्सव कोणताही असला तरी अन्न सुरक्षा कायद्यानुसार 'फूड बिझनेस ऑपरेटर' म्हणून नोंदणीकृत परवाना घेणे आणि नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. मुंबई प्रेस क्लब येथे बुधवारी (दि.२६) आयोजित 'मीट द मीडिया' कार्यक्रमात त्यांनी अन्न सुरक्षेच्या मुद्यावर प्रशासनाची भूमिका मांडली. याशिवाय राज्यातील अंगणवाड्यांमधील पोषण आहार, शालेय पोषण आहार आणि 'मिड-डे मील'च्या व्यवस्थेची तपासणी करण्याचे निर्देश एफडीएच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे निकृष्ट दर्जाचे जेवण पुरवणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या यंत्रणा रडारवर आल्या आहेत.

# शालेय विद्यार्थ्यांची होणार नेत्रतपासणी

## त्रिपक्षीय सामंजस्य करार, मोफत चष्मे मिळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासनामार्फत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभाग तसेच रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन यांच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या करारावेळी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल यांच्यासह रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त राजीव मेहता, वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशनचे संचालक वेणू अंबाती आदी उपस्थित होते.



सामंजस्य करारानुसार राज्यातील शासकीय शाळांमधील पाचवी ते दहावीच्या २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल. रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून कार्य करणार असून वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहील. दृष्टीदोष असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याची जबाबदारीही ही संस्था घेणार आहे.

या कराराचा कालावधी ३६ महिन्यांचा राहणार आहे. या कालावधीत राज्यभरात डोळे तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. प्रकल्पाच्या प्रगतीचे नियमित परीक्षण आणि मूल्यमापन करण्यात येणार असून त्रैमासिक प्रगती अहवालाद्वारे तपासणी शिबिरांची संख्या, लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या, चष्मा वितरण आणि अन्य बाबींचा आढावा घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आवश्यक माहितीचे वैज्ञानिक पद्धतीने संकलन करण्यात येणार आहे. यापूर्वी २०१९पासून या उपक्रमाद्वारे १८ जिल्ह्यांतील ८०० शाळांमधील सहा लाख ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून ६३ हजारांहून अधिक चष्मे पुरविण्यात आले आहेत.

वाढत्या स्क्रीन टाईममुळे अनेक विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच डोळ्यांच्या समस्या उद्भवू लागल्या आहेत. योग्य वयात याचे निदान झाल्यास भविष्यातील गंभीर धोके टाळता येतात. ही बाब लक्षात घेऊन सरकारने विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करण्याचा आणि दृष्टीदोष असलेल्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आजारांचे आणि तक्रारींचे वेळेत निदान व त्यावर उपचार होण्यास मदत होईल. गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध झाल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळणार आहे.

# एमपीएससी पेपरफुटीप्रकरणी तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक (गट-ब) परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात गुन्हे शाखेने बुधवारी (दि.२६) धडक कारवाई केली. या प्रकरणी एमपीएससीच्या अप्पर सचिवांसह तीन अधिकारी, क्लास संचालक आणि विद्यार्थ्याच्या नातेवाइकांना अशा एकूण सहा जणांना अटक करण्यात आली. सर्व आरोपींना न्यायालयाने २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार तपासादरम्यान आरोपी विश्वेश्वर दत्तात्रय नकाते (सहाय्यक कक्ष अधिकारी, एमपीएससी), अभिजीत गणपतराव लेंडवे (अवर सचिव, एमपीएससी), गोपाळ भट्टु मराठे (सहाय्यक कक्ष अधिकारी, एमपीएससी) यांच्यासह प्रविण दिलीप पाटील (संचालक कौटील्य अकादमी, नंदुरबार), अमृत नामदेव पाटील आणि लोकेश उर्फ गौरव राजेंद्र पाटील यांचा गुन्ह्यात सहभाग निष्पन्न झाला. त्यामुळे त्यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना पोलीस कोठडी सुनावल्यामुळे चौकशीत या रॅकेटचे आणखी कोणते धागेदोरे आणि मोठे चेहरे समोर येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पेपरफुटीचा हा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर एमपीएससीने तातडीने कठोर निर्णय घेत औषध निरीक्षक (गट-ब) परीक्षा रद्द केली. या निर्णयामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या परीक्षार्थींना अंशतः दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, उपरोक्त पदांसाठी फेरपरीक्षा घेण्यात येणार असून संबंधित उमेदवारांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच फेरपरीक्षेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. फेरपरीक्षेची तारीख व अन्य तपशील स्वतंत्र प्रसिद्धिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येणार आहेत, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने म्हटले आहे.

## बनावट नोटा वटवणारा अटकेत

**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील बाजारपेठेत खोट्या नोटा चालवून व्यापाऱ्यांना गंडवणाऱ्या एका भामट्याला पोलिसांनी रंगेहाथ पकडले आहे. त्याच्याकडून ५०० रुपये मूल्याच्या ४१ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

प्रवीण धर्माजी पाटील असे आरोपीचे नाव आहे. तो मूळचा पेण तालुक्यातील दादर येथील रहिवासी असून सध्या पेणच्या फणसडोंगरी परिसरात राहतो. या भामट्याने खोट्या नोटा खऱ्या चलनी नोटांसारख्या भासवून पाली बाजारपेठेतील विविध दुकानदारांकडून जीवनावश्यक वस्तूंची खरेदी केली. त्याला दुसऱ्या दिवशी अटक करण्यात आली.

पोलिसांनी आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडे ५०० रुपये दराच्या ४१ बनावट नोटा आढळल्या. पोलिसांनी या सर्व नोटा जप्त केल्या आहेत. या प्रकरणी त्याला अटक करण्यात आली असून पाली पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

## आश्रमशाळेतील विद्यार्थिनींचा विनयभंग

**शहापूर : प्रतिनिधी**

शहापूरमधील येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत तब्बल २१ अल्पवयीन विद्यार्थिनींचा विनयभंग झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी स्वयंपाक्याचा मदतनीस म्हणून काम करणाऱ्या गणपत गवळी याच्याविरुद्ध शहापूर पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

# पनवेलमध्ये एसआयआर बीएलए प्रशिक्षण कार्यशाळा

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात बुधवारी (दि.२६) भारतीय जनता पक्षाच्या वतीने एसआयआर बीएलए २ प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहचणे या उद्देशाने ही कार्यशाळा भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली झाली.



या प्रशिक्षण कार्यशाळेला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, मधू पाटील, रवींद्र जोशी, अजय बहिरा, नगरसेवक दशरथ म्हात्रे, सुमित झुंजारराव, विकास घरत, प्रवीण पाटील, दिनेश खानावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, अमित ओझे, मयुरेश नेतकर, महिला मोर्चाच्या प्रिया मुकादम, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### सरसंघचालक न्यूयॉर्कमध्ये दाखल



**न्यूयॉर्क** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटन या तीन देशांच्या दौऱ्यांतर्गत पहिल्या टप्प्यात न्यूयॉर्क शहरात दाखल झाले आहेत. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित जागतिक संपर्क उपक्रमाचा हा दौरा भाग असल्याचे सांगण्यात आले आहे. भागवत हे शनिवारी विश्वव्यापी एकता या कार्यक्रमात प्रसिद्ध मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये मेळाव्याला संबोधित करणार आहेत.

### डब्ल्यूसीएल यंदा यूएईत

**नवी दिल्ली :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्सचा (डब्ल्यूसीएल) तिसरा हंगाम संयुक्त अरब अमिरातीमध्ये (युएई) आयोजित करण्यात येणार आहे. या लीगमधील सामने ३ ते १८ ऑक्टोबरदरम्यान खेळले जातील.

# पनवेल मनपातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव नियोजन बैठक

## मंडळांना मंडप परवानगीसाठी ऑनलाइन एक खिडकी प्रणाली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक गणेशोत्सव उत्साहपूर्ण, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी पनवेल महापालिकेच्या वतीने मंगळवारी महापौर नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सव नियोजन बैठक घेण्यात आली. यावेळी गणेश मंडळांना मंडप उभारणीस ऑनलाइन पद्धतीने परवानगी मिळण्यासाठी तयार करण्यात आलेल्या संकेतस्थळाचे लोकार्पण करण्यात आले.



फडके नाट्यगृहात झालेल्या या बैठकीस सभागृह नेते प्रकाश बिनेदार, चारही प्रभागांचे सभापती, महापालिका सदस्य, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, रविकिरण घोडके, अभिषेक पराडकर, महापालिका क्षेत्रातील सहा पोलीस ठाण्यांचे निरीक्षक, सिडको, महावितरणचे अधिकारी तसेच विविध गणेश मंडळांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत गणेश मंडळांच्या विविध सूचनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी महापौर नितीन पाटील यांनी उपस्थित गणेश मंडळांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचे स्वागत करून त्यावर सकारात्मकतेने तोडगा काढला जाईल, असे आश्वासन दिले. पनवेल शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी व्यापारी वर्गासोबत चर्चा करण्यात येईल. कोळीवाड्याजवळील विसर्जन घाटावर लिफ्टची सुविधा उभारण्याची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. बल्लाळेश्वर तलावातील गणेश विसर्जनाची व्यवस्था अधिक सुकर व्हावी यासाठी आणखी एका तराफ्याची व्यवस्था करण्याची सूचना महापौरांनी महापालिका प्रशासनाला केली.


अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी सांगितले की, गणेश मंडळांच्या प्रतिनिधींना परवानगी प्रक्रियेसाठी महापालिका कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासू नये यासाठी ऑनलाइन एक खिडकी प्रणाली राबविण्यात येत आहे. **(पान २ वर..)**

# नेपाळमध्ये महाप्रलय; १०५ भारतीय पर्यटक बेपत्ता

**काठमांडू : वृत्तसंस्था**

नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला अचानक आलेल्या भीषण पुरामुळे मोठी हानी झाली आहे. या दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाला असून ४१ सुरक्षा कर्मचारी बेपत्ता आहेत. त्याचबरोबर २९१ परदेशी नागरिक बेपत्ता झाल्याचे सांगितले जात असून त्यात १०५ भारतीय पर्यटकांचा समावेश आहे.


पुराच्या वेगवान प्रवाहात अनेक वाहने आणि स्थानिक भाग वाहून गेले. रस्ते आणि पूल तसेच जलविद्युत प्रकल्पांच्या पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले आहे. नेपाळ पर्यटन मंडळाच्या माहितीनुसार पुरामुळे २९१ परदेशी नागरिक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. त्यापैकी किमान १०५ भारतीय पर्यटक असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, बचाव पथकांकडून बेपत्ता नागरिक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांचा शोध सुरू असून पुरामुळे बाधित भागांमध्ये मदत आणि बचावकार्याला वेग देण्यात आला आहे.



दरम्यान, या आपत्तीच्या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याशी फोनवरून चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे मदत आणि बचाव कार्यासाठी आमची पथके एकमेकांशी समन्वय साधत आहेत, अशी माहिती पंतप्रधान मोदींनी सोशल मीडिया पोस्टद्वारे दिली.

## इमारतीवरून महिला पडली अन् झाडामुळे बचावली!

**मुंबई** : भांडूप येथे एक झाड महिलेसाठी देवदूत ठरले आहे. एका इमारतीतून दहाव्या मजल्यावरून पडलेली महिला खाली असलेल्या झाडाच्या फांद्यांमध्ये अडकली आणि तिचा जीव वाचला. सनशाईन एसआरए इमारतीत हा प्रकार घडला. इमारतीच्या दहाव्या मजल्यावरुन एक महिला अचानक खाली पडली. सुदैवाने इमारतीखाली असलेल्या एका मोठ्या झाडात ती अडकल्यामुळे थेट जमिनीवर आदळण्यापासून वाचली. घटनेचे गांभीर्य ओळखून नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला माहिती दिली. अग्निशमन दलाचे जवान तसेच पोलिसांनी घटनास्थळी पोहचून तातडीने बचावकार्य सुरू केले आणि महिलेला झाडावरून सुरक्षितपणे खाली उतरवले.



**मुरूड : यंदा उशिरा सुरू झालेल्या पावसाने नंतर दमदार बरसत बळीराजाला दिलासा दिला. सध्या भातपीक जोमाने वाढत असून पिकावर कीडरोगांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी शेतकरी काळजी घेत आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)



# सायबर फसवणूक झाल्यास १९३० क्रमांकावर तत्काळ संपर्क साधा -मुख्यमंत्री

## डिजिटल अरेस्ट सायबर जनजागृती लघुपट आणि १९३० महाराष्ट्र सायबर अँथमचे लोकार्पण



**मुंबई : प्रतिनिधी**

सायबर गुन्हेगारांकडून पोलीस, सीबीआय किंवा न्यायाधीशांच्या नावाने नागरिकांना भीती दाखवून, घाबरवून फसवणूक केली जाते. त्यामुळे नागरिकांनी अशा कोणत्याही प्रकारांना बळी न पडता सायबर फसवणूक झाल्यास तातडीने ‘१९३०’ या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र सायबरच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘डिजिटल अरेस्ट’ या सायबर जनजागृती लघुपटाचे आणि ‘१९३० महाराष्ट्र सायबर अँथम’चे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, पोलीस महासंचालक सदानंद दाते, अतिरिक्त पोलीस महासंचालक (सायबर) संजय शिंत्रे, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव उपस्थित होते.

यावेळी लघुपट व १९३० महाराष्ट्र सायबर अँथम मध्ये योगदान देणारे कलाकार आशिष विद्यार्थी, पंकज त्रिपाठी, शरद केळकर, सोनाली बेंद्रे, जावेद जाफरी, गायिका सुनिधी चौहान, अभिषेक बॅनर्जी, मंगेश देसाई, समय रैना आदी कलाकार उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर फसवणुकीनंतरचा ‘गोल्डन अवर’ अत्यंत महत्त्वाचा असून, या काळात तक्रार नोंदविल्यास फसवणुकीची रक्कम रोखण्याची किंवा परत मिळविण्याची शक्यता अधिक असते. मात्र नागरिकांकडून तक्रार नोंदविण्यास तीन ते पंधरा दिवसांचा विलंब झाल्यास पैसे अनेक खात्यांमधून वळविले जातात आणि त्यांची रिकव्हरी अत्यंत कठीण होते. त्यामुळे फसवणूक झाल्याचे लक्षात येताच विलंब न करता १९३० वर संपर्क साधणे आवश्यक आहे.

मोबाईल, ऑनलाइन व्यवहार, विविध पेमेंट गेटवे आणि डिजिटल माध्यमे ही दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाली आहेत. तंत्रज्ञानामुळे जीवन सुलभ झाले असले, तरी त्याचबरोबर नागरिक सायबर गुन्ह्यांना बळी पडण्याची शक्यताही वाढली आहे. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांचा मुकाबला करण्यासाठी पोलिस यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासोबतच नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे आवश्यक असल्याचे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

सायबर गुन्हेगारांकडून पार्सलमध्ये ड्रग्ज सापडल्याचे सांगणे, ओटीपी फ्रॉड, बनावट फोन कॉल, पोलीस अथवा सीबीआयच्या नावाने धमकावणे अशा विविध क्लृप्त्यांचा वापर केला जातो. स्क्रीनवर खाकी वर्दीतील व्यक्ती, पोलीस अधिकारी किंवा न्यायाधीशांचे रूप पाहून सामान्य नागरिक घाबरून जातो आणि त्यातून फसवणुकीला बळी पडतो. त्यामुळे अशा कोणत्याही दबावाला किंवा भीतीला बळी न पडण्याचे आवाहन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सायबर गुन्हे रोखण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय असून कलाकार, अभिनेते आणि गायकांच्या माध्यमातून हा संदेश नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचू शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

‘डिजिटल अरेस्ट’ या ४२ मिनिटांच्या जनजागृती चित्रपटासह विविध क्लिप्स आणि रील्सच्या माध्यमातून सोशल मीडियावर व्यापक अभियान राबवून हा संदेश प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे व्हॉईस क्लोनिंग, डीपफेक तसेच बनावट ऑडिओ आणि व्हिडिओ तयार करण्याचे नवे आव्हान निर्माण झाले आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी महाराष्ट्र सायबरकडून सुरू असलेले कार्य प्रशंसनीय असून, भविष्यातही सर्वांच्या सहकार्याने व्यापक सायबर जनजागृती मोहीम यशस्वी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमात यावेळी महाराष्ट्र सायबर सेलचे प्रमुख यशस्वी यादव यांनी भविष्यातील महाराष्ट्र सायबर सेफ ॲप आणि आशा कॉल बोट’ या प्रकल्पाची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ‘डिजिटल अरेस्ट’ या सायबर जनजागृती लघुपटात आणि ‘१९३० महाराष्ट्र सायबर अँथम’ मध्ये योगदान देणाऱ्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कलाकारांनी मनोगत व्यक्त केले.

# कर्जत–मुरबाड महामार्गावर गायीला धडकून तरुणाचा दुर्दैवी अंत

**नेरळ : प्रतिनिधी**



कर्जत–मुरबाड राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसतानाच पोसरी–तिवरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर झालेल्या भीषण अपघातात पंकज मुने (वय २६) या दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. दोन दिवसांत याच महामार्गावर झालेला हा दुसरा जीवघेणा अपघात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंकज मुने हा आपल्या हिरो होंडा (MH–०६ BA १५८९) या मोटारसायकलवरून जात असताना पोसरी–तिवरे येथील जिल्हा परिषद शाळेजवळ अचानक एक गोवंशीय गाय रस्त्यावर आली. गायीला जोरदार धडक बसल्याने पंकज रस्त्यावर फेकला गेला व गंभीर जखमी झाला.

स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याला कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले.

महामार्गावर भटक्या जनावरांचा वाढता वावर, वेगवान वाहतूक आणि सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला असून प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# तीन लाख ग्राहकांकडे १०४.३४ कोटींची वीजबिल थकबाकी

## महावितरणच्या भांडूप परिमंडलात थकबाकीदारांविरोधात धडक वसुली मोहीम

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महावितरणच्या भांडूप परिमंडलातील तब्बल २ लाख ९९ हजार १४० लघुदाब ग्राहकांकडे रु. १०४.३४ कोटींची वीजबिल थकबाकी प्रलंबित आहे. घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर या वर्गवारीतील थकबाकीची वसुली करण्यासाठी भांडूप परिमंडलात विशेष तीव्र मोहीम राबविण्यात आली आहे. थकबाकीदार ग्राहकांनी आपले प्रलंबित वीजबिल तातडीने भरावे, अन्यथा नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा महावितरणने दिला आहे.

भांडूप परिमंडलांतर्गत पेण, ठाणे व वाशी या तीन मंडळांमध्ये वीजबिलाची मोठी थकबाकी प्रलंबित आहे. यामध्ये सर्वाधिक थकबाकी पेण मंडळात असून, १ लाख १४ हजार ७९४ ग्राहकांकडे रु. ३१ कोटी थकीत आहेत. वाशी मंडळातील १ लाख १५ हजार ६२२ ग्राहकांकडे रु.४७ कोटी, तर ठाणे मंडळातील ६८ हजार ७२४ ग्राहकांकडे रु.२७ कोटींची वीजबिल थकबाकी आहे. यामध्ये, घरगुती ग्राहकांकडे सर्वाधिक थकबाकी आहे. भांडूप परिमंडलातील लघुदाब घरगुती वर्गवारीतील २ लाख ५३ हजार २२४ ग्राहकांकडे रु.५५.८३ कोटींची थकबाकी आहे. लघुदाब वाणिज्यिक वर्गवारीतील ४० हजार ३२९ ग्राहकांकडे रु.३५.५० कोटी, तर लघुदाब औद्योगिक वर्गवारीतील ५ हजार १२ ग्राहकांकडे ₹१२.३६ कोटीची थकबाकी प्रलंबित आहे. तसेच इतर वर्गवारीतील ५७५ ग्राहकांकडे रु.०.६४ कोटींची थकबाकी आहे.

मुख्य अभियंता, भांडूप परिमंडल, संजय पाटील यांनी सांगितले की, “भांडूप परिमंडलातील ३ लाखांहून अधिक लघुदाब ग्राहकांकडे रु.१०४ कोटींपेक्षा अधिक वीजबिल थकबाकी प्रलंबित आहे. महावितरणकडून ग्राहकांना दर्जेदार व अखंडित वीजसेवा देण्यासाठी पायाभूत सुविधांच्या देखभाल–दुरुस्तीवर सातत्याने मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. त्यामुळे वापरलेल्या विजेचे बिल वेळेत भरणे ही प्रत्येक ग्राहकाची जबाबदारी आहे. थकबाकीदार ग्राहकांनी कारवाईची वेळ येऊ न देता आपली थकीत वीजबिले तातडीने भरून महावितरणला सहकार्य करावे. सूचना देऊनही थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांविरोधात नियमानुसार कारवाई करण्यात येईल.”

# ताम्हिणी घाटात २० फूट दरीत अज्ञात महिलेचा आढळला मृतदेह

**माणगाव : प्रतिनिधी**

ताम्हिणी घाटातील दरीमध्ये अज्ञात महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मंगळवार, दि. २५ ऑगस्ट रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार समोर आला. घाटातील महिंद्रा थार वाहनाचा अपघात झालेल्या परिसरातील सुमारे २० फूट खोल दरीत मृतदेह दिसून आला.



मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरी खोल असल्याने मृतदेह बाहेर काढण्यासाठी एस व्हि आर एस एस रेस्क्यू टीम कोलाड व शेलार मामा रेस्क्यू टीम भिरा माणगाव यांची मदत घेण्यात आली. रेस्क्यू पथकाच्या सहकार्याने मोठ्या प्रयत्नांनंतर मृतदेह दरीतून बाहेर काढण्यात आला. मृत महिलेची अद्याप ओळख पटलेली नसून ती नेमकी कोण आहे, तसेच तिचा मृत्यू कशामुळे झाला, याबाबत माणगाव पोलीस तपास करीत आहेत. महिलेचा अपघात होऊन मृत्यू झाला की तिला मारून मृतदेह दरीत फेकण्यात आला, या दोन्ही शक्यता तपासल्या जात असल्याची माहिती आहे.

घटनास्थळाची पाहणी करून पोलिसांनी आवश्यक पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.मृतदेहाचे वर्णन सदर मृतदेह स्त्री जातीचा असून वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून अंगात नेसूस लालसर रंगाचा टॉप, काळ्या रंगाची लेगीज, निळ्या रंगाची ओढणी, डाव्या हातावर स्टार आणि विंचूचे टॅटू, तर उजव्या हातावर राम आणि ओम चे टॅटू गोंदविण्यात आले आहे.शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. महिलेची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर असून परिसरातील बेपत्ता व्यक्तींबाबतही माहिती घेतली जात आहे. दरम्यान, थार वाहनाचा अपघात झाला होता आणि त्याच परिसरात दरीमध्ये अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याने या घटनेबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

# माणगाव तालुक्यात युरिया खताचा शेतकऱ्यांना तुटवडा

**माणगाव : बातमीदार**

तालुक्यात युरिया खताचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याचे समोर आले असून, ऐन पावसाळी शेती हंगामात युरिया उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतीची कामे सुरू असताना आवश्यक वेळी खताचा पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.

युरिया खताच्या तुटवड्याबाबत मिळालेल्या माहितीनंतर आमच्या प्रतिनिधीने बुधवारी, दि. २६ रोजी दुपारी सुमारे १ वाजता माणगाव शहरातील एका खत विक्री केंद्राला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यावेळी युरिया खताचा साठा उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. याचदरम्यान एक शेतकरी दाम्पत्य युरियाच्या उपलब्धतेबाबत चौकशी करण्यासाठी दुकानात आले. मात्र, विक्री केंद्रातील कर्मचाऱ्यांनी युरिया उपलब्ध नसल्याचे सांगितले. ‘युरिया कधी उपलब्ध होईल?’ अशी विचारणा केली असता, गेल्या पाच दिवसांपासून युरिया खताचा साठा संपलेला असून तो पुन्हा कधी उपलब्ध होईल, हे सांगता येत नसल्याचे कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर हे शेतकरी दाम्पत्य निराश होऊन तेथून निघून गेले.

सध्या पावसाळी शेतीचा हंगाम सुरू असून अनेक भागांत शेतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. अशा परिस्थितीत पिकांसाठी आवश्यक असलेले युरिया खत उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खताच्या उपलब्धतेबाबत निश्चित माहिती मिळत नसल्याने पुढील शेती नियोजनावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, खत विक्री केंद्रावर कृषी क्षेत्राशी संबंधित चौकशीसाठी असलेल्या टोल–फ्री क्रमांकावर संपर्क साधला असता पुणे येथील कृषी आयुक्तालयाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी दूरध्वनी स्वीकारला. माणगाव तालुक्यातील युरिया खताच्या तुटवड्याची माहिती त्यांना देण्यात आली.

# मिशन युथ : व्यसनमुक्त नवी मुंबई! आमदार मंदा म्हात्रे साधणार युवकांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

“युवकांनी व्यसनाच्या आहारी न जाता आपल्या स्वप्नांना आणि उज्वल भविष्याला बळ देऊन, त्यांच्यातील ऊर्जा योग्य दिशेने वळवली तर नवी मुंबईची युवा शक्ती देशाच्या प्रगतीत मोठे योगदान देऊ शकते,” या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.नवी मुंबईतील युवा पिढीला व्यसनांपासून दूर ठेवत त्यांना सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि उज्वल भविष्याची दिशा देण्यासाठी ‘मिशन युथः व्यसनमुक्त नवी मुंबई’ या विशेष जनजागृती अभियानाचे आयोजन आमदार मंदा म्हात्रे यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ‘व्यसनाला नकार, स्वप्नांना होकार’ हा संदेश नवी मुंबईतील प्रत्येक युवकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता सिडको एक्जीबिशन, वाशी नवी मुंबई येथे विशेष युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात नवी मुंबईतील मोठ्या संख्येने युवक सहभागी होणार असून, आमदार मंदा म्हात्रे या युवकांशी थेट संवाद साधणार आहेत. युवकांच्या समस्या, त्यांच्या अपेक्षा, करिअर, शिक्षण, क्रीडा, कौशल्यविकास तसेच व्यसनांपासून दूर राहण्यासाठी आवश्यक असलेल्या सकारात्मक पर्यायांवर या संवादातून चर्चा करण्यात येणार आहे.

आजच्या काळात तरुणाईसमोर विविध प्रकारच्या व्यसनांचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. व्यसनामुळे युवकांचे आरोग्य, शिक्षण, करिअर आणि कौटुंबिक जीवन प्रभावित होत आहे. त्यामुळे केवळ व्यसनमुक्तीचा संदेश देण्याऐवजी युवकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करून त्यांना त्यांच्या स्वप्नांकडे आणि ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करणे, हा ‘मिशन युथ’ अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

नवी मुंबईतील सर्व युवक–युवती, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी या विशेष युवा संवाद कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे यांनी केले.

# मुंबई–पुणे एक्सप्रेस वेवर ट्रेलरची तांदळाच्या ट्रकला धडक; ट्रेलरचालक जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवर आज सकाळी एका ट्रेलरने समोरील चालणाऱ्या तांदळाच्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात ट्रेलर चालक जखमी झाला आहे

मुंबई–पुणे एक्सप्रेसवेवरून पुण्यावरून मुंबई कडे ट्रेलर क्रमांक( MH ४६ CU २२७१ ) हा चालक कमरूल होड हा घेऊन जातं असताना तो बोरघाटात ढेकू गावच्या हद्दीत आला असता चालकाचे ट्रेलर वरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील तांदळाचा ट्रक क्रमांक( MH ११ DD ५२३३) याला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, आयआरबी टीम अपघात ग्रस्तटीमचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल होत ट्रेलर मध्ये अडकलेल्या चालकाला तात्काळ बाहेर काढून त्याला ॲम्ब्युलन्सने एमजीएम रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले, तर या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले तर तांदळाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ही दोन्ही अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या साहाय्याने बाजूला घेऊन एक्सप्रेसवे वाहतुकीसाठी चालू करण्यात आला आहे.



## पान १ वरुन

### पनवेल मनपातर्फे सार्वजनिक गणेशोत्सव नियोजन बैठक

कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर परवानगी प्रक्रियेसाठी प्रत्येक प्रभाग समितीत नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येईल. शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी महापालिकेची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या ठिकाणी तातडीने कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी म्हटले.


सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ यांनी मोठ्या गृहनिर्माण संस्थांनी गणेशमूर्तींच्या आगमन व विसर्जन मिरवणुकीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी, असे आवाहन केले. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत तसेच रात्रीच्या वेळी स्वयंसेवक तैनात करावेत, अशी सूचना त्यांनी केली. गणेशोत्सवातील देखावे आक्षेपार्ह नसावेत आणि मिरवणुकांचे वेळापत्रक पोलिसांच्या सूचनेनुसार निश्चित करावे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात उपायुक्त रविकिरण घोडके यांनी गणेश मंडळांसाठी राबविण्यात येत असलेल्या ऑनलाइन एक खिडकी प्रणालीची माहिती दिली. या प्रणालीद्वारे वाहतूक पोलीस, पोलीस ठाणे, अग्निशमन विभाग आणि मालमत्ता विभाग यांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून प्रभाग समिती अ, ब, क, ड तसेच उपविभाग नावडे यांच्या माध्यमातून मंडप परवानगी देण्यात येणार आहे.

गणेश मंडळांना विविध विभागांच्या परवानग्यांसाठी स्वतंत्रपणे कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी ही संपूर्ण प्रक्रिया एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मंडप परवानगीसाठी https://pandal.maharts.com/ हे स्वतंत्र संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून गणेश मंडळांनी या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# मिसेस रायगड फॅशन शोमध्ये 'घे उंच भरारी तू' ग्रुपचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



डी.एस. (दीपक शेट्टी) एंटरटेनमेंट तर्फे आयोजित मिसेस रायगड – सीझन ४ भव्य फॅशन शो हा कार्यक्रम २३ ऑगस्ट रोजी खारघर येथे उत्साहात पार पडला.

या स्पर्धेत 'घे उंच भरारी तू' ग्रपच्या वंदना मदन बडगुजर व शर्वरी शिवप्रसाद निकम यांना “सुपर से ऊपर” या श्रेणीमध्ये आणि प्रेरणा गायकवाड यांना क्लासिक श्रेणीमध्ये विजेत्या ठरल्या. त्याच बरोबर शर्वरी निकम 'सुंदर केस', वंदना बडगुजर 'सर्वाधिक लोकप्रिय,'प्रेरणा गायकवाड Most Confident व वंदना (धनश्री) Most Inspiring हे किताबही पटकावले विजेत्यांनी आपल्याला संस्थापिका अध्यक्ष संजिवनी मालवणकर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले, त्यामुळे हे यश मिळाल्याचे सांगितले.

# विनापरवाना इमारत उभारून २८ जणांची फसवणूक

## पनवेल तालुका पोलिसांकडून विकसकावर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

बांधकामासाठी आवश्यक परवानग्या नसतानाही इमारत उभारून तब्बल २८ जणांना सदनिका विकल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी विकसकाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. चिंचवली येथील शेतजमिनीवर उभारलेल्या या इमारतीला कोणत्याही संबंधित सरकारी विभागाची बांधकाम परवानगी नसल्याचे पोलिसांच्या चौकशीत समोर आले आहे.

पनवेल ग्रामीण परिसरातील मोठा भाग नवी मुंबई विमानतळ अधिसूचित प्रभाव क्षेत्र अर्थात नैना प्राधिकरणाच्या अखत्यारित येतो. या परिसरात शेतजमिनींवर आवश्यक परवानग्या न घेता बांधकामे केली जात असल्याच्या तक्रारी यापूर्वीही समोर आल्या आहेत. चिंचवली गावातील सर्व्हे क्रमांक ६४–३–ब या शेतजमिनीवरही अशाच प्रकारे इमारत उभारण्यात आल्याचा आरोप आहे.

विकासकाने बांधकामासाठी आवश्यक परवानग्या असल्याचे भासविल्याने २०२० पूर्वी काही नागरिकांनी येथे सदनिका खरेदी केल्या. विशेष म्हणजे, या सदनिकांची दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी झाल्याने खरेदीदारांना आपली घरे कायदेशीर असल्याचा विश्वास होता.

**गृहसंस्था स्थापन करताना प्रकार उघडकीस**

सदनिकाधारकांनी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यासह मानिव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयाशी संपर्क साधला. त्यावेळी संबंधित इमारतीला आवश्यक बांधकाम परवानगी नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर सदनिकाधारकांनी पनवेल तालुका पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित काकडे यांनी तक्रारीची चौकशी केली. संबंधित इमारतीला कोणत्या सरकारी विभागाची परवानगी आहे, याची माहिती मिळविण्यासाठी गटविकास अधिकारी, नैना प्राधिकरण, दुय्यम निबंधक, तहसीलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्रव्यवहार करण्यात आला.

या चौकशीत संबंधित बांधकामाला कोणत्याही सरकारी विभागाकडून आवश्यक बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट झाले.दरम्यान, संबंधित बांधकामासाठी ग्रामसेवकाने ना–हरकत प्रमाणपत्र दिल्याचा दावा विकसकाने पोलिसांकडे केला आहे. या दाव्याचीही पोलिसांकडून चौकशी सुरू आहे.

परिमंडळ तीनच्या पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यासमोर सादर करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र मालकी हक्काचा अधिनियम तसेच भारतीय न्यायसंहितेतील संबंधित कलमांनुसार विकसकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.बांधकाम परवानगी आणि भोगवटा प्रमाणपत्र नसतानाही सदनिकांची विक्री करून २८ खरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप विकसकावर आहे. २०२० ते २०२६ या कालावधीत ही फसवणूक झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सीए फाउंडेशन मार्गदर्शन सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथे रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभाग सीए फाउंडेशन कोचिंग कमिटी आणि आयसीएआय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी सीए फाउंडेशन कोचिंग संदर्भातील विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्राचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना चार्टर्ड अकाउंटन्सी या प्रतिष्ठित व्यावसायिक अभ्यासक्रमाची माहिती देणे, सीए फाउंडेशन परीक्षेची तयारी कशी करावी याबाबत मार्गदर्शन करणे तसेच विद्यार्थ्यांना सीए फाउंडेशन कोचिंगमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता.सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना आय सी ए आयच्या पदाधिकाऱ्यांनी सीए अभ्यासक्रमाची रचना, पात्रता, प्रवेश प्रक्रिया, परीक्षा पद्धती, अभ्यासाचे नियोजन, आवश्यक कौशल्ये आणि भविष्यातील करिअरच्या संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सीए क्षेत्रातील उज्वल करिअरच्या संधींची जाणीव झाली असून, भविष्यात सीए होण्याच्या दिशेने योग्य नियोजन करण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळाली. महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आवश्यक मार्गदर्शन व शैक्षणिक सहकार्य उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांना या उपक्रमामुळे अधिक बळ मिळाले.या यशस्वी उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम, प्रा. विशाल देशमुख व प्रा. डॉ. सोनाली मुखर्जी यांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य लाभले. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल वाणिज्य विभागातर्फे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीए फाउंडेशन कोचिंग कमिटी आणि संबंधित सर्व सदस्यांचेही विशेष कौतुक करण्यात आले. तसेच मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे वाणिज्य विभागातर्फे अभिनंदन व आभार मानण्यात आले.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक विकासासाठी अशा प्रकारच्या मार्गदर्शनपर उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांनी उपलब्ध होणाऱ्या विविध व्यावसायिक संधींचा लाभ घेऊन आपल्या उज्वल भविष्यासाठी योग्य दिशेने वाटचाल करावी, हा या उपक्रमाचा प्रमुख संदेश होता.

## गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी बससेवा



**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या निमित्ताने शिवसेना नगरसेवक तथा महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना पनवेलच्या वतीने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी मोफत बससेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या १२ सप्टेंबर रोजी पनवेलहून कोकणातील विविध ठिकाणी या बस रवाना होणार आहेत. यामध्ये राजापूर (पाली, लांजामार्गे), रत्नागिरी (संगमेश्वर), चिपळूण, खेड आणि दापोली या मार्गांचा समावेश आहे.

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांना या मोफत बससेवेचा लाभ घेता येणार असून बसच्या जागा मर्यादित असल्याने इच्छुकांनी वेळेत नोंदणी करावी, असे आवाहन शिवसेना पनवेलच्या वतीने करण्यात आले आहे. मोफत बससेवेसाठी २७ ऑगस्टपर्यंत नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी धीरज निंबाळकर ९००४२३१६०२ किंवा खंडेश धनावडे ९९८७७६१५२ यांच्याशी संपर्क साधावा. गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या भाविकांना सुरक्षित व विनामूल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे स्वागत होत आहे.



# शालेय विद्यार्थ्यांची आरोग्यदायी सुरक्षा महत्त्वाची : भगवान भोसले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शालेय विद्यार्थी हे आपल्या राष्ट्राचं भविष्य आहे. विद्यार्थ्यांना सकस आरोग्यदायी आहार व संस्कार करणारे योग्य शिक्षण त्याचबरोबर विद्यार्थ्यांची सर्वच प्रकारची सुरक्षा घेतली तर आपलं राष्ट्र सशक्त अन बलवान होण्यास वेळ लागणार नाही. याकरता शाळेतील मुलांची सुरक्षा आणि आरोग्याची पुरेपूर काळजी शाळा प्रशासनाने घेण्याचे आवाहन राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे संचालक भगवान भोसले यांनी कळंबोली येथे केले.

अन्नसुरक्षा व मानके अधिनियम २००६ वअधिनियम २०११ अंतर्गत कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलात पनवेल पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून पनवेल तालुक्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापकांचे विद्यार्थी आरोग्य व सुरक्षा याबाबत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चा सत्रात पनवेल तालुक्यातील विविध शाळांचे ४०० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते.या कार्यक्रमाला राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे संचालक भगवान भोसले, सहकारी संदीप धामणे, पनवेल चे गटशिक्षणाधिकारी शाहू सतपाल पनवेल महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण माजी प्राचार्य भगवान माळी सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे व इतर सहकारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सुरक्षा परिषदे तर्फे नव्या शैक्षणिक वर्षापासून सुरू केलेल्या स्कूल सेफ्टी या अभिनव उपक्रमांमधून पारितोषिक दिले जाणार असल्याची माहिती उपस्थित मुख्याध्यापक व पदाधिकाऱ्यांना यावेळी देण्यात आली . या स्कूल सेफ्टी अभियानामध्ये सर्वच शाळांनी सहभागी होण्याचे आवाहन होईल यावेळी संचालक भगवान भोसले यांनी केले



**पनवेल : टीआयपीएलचे अभियंता शिवाजी अहिरकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : येथील सय्यद अकबर यांची भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश महामंत्रीपदी नियुक्ती झाली आहे. याबद्दल भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**



# शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांचा सन्मान

**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद कृषी व पशुधन तसेच मत्स्यविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्यात राज्य शासनाच्या वतीने विविध पुरस्कार प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान सोहळा अलिबाग येथील रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी सभागृहात सोमवारी (दि. २४) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे, कृषीच्या सातपुते यांच्यासह जिल्हा परिषद सदस्य कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

यावेळी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे महाराष्ट्र शासनाचे वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराचे मानकरी प्रफुल्ल काळूराम खारपाटील (चिरनेर) यांचा रायगड जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्रसामग्रीला प्राधान्य देऊन, कृषी उत्पादन वाढविण्यासाठी केलेले विविध प्रयोग तसेच शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची त्यांची सकारात्मक दृष्टी तसेच शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आक्रमक होऊन शासनाच्या कृषी अधिकाऱ्यांना जाब विचारणाऱ्या प्रफुल्ल खारपाटील या शेतकऱ्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठानतर्फे मंगळागौर उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**



रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने करंजाडे येथे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेला मंगळागौर सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. महिलांनी पारंपरिक खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध कलाविष्कार सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

कार्यक्रमाच्या तयारीसाठी महिलांनी सुमारे महिनाभर नियमित सराव केला होता. त्यांच्या मेहनतीचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठानचे सरचिटणीस दिनेश धामणस्कर यांनी कौतुक केले. महिलांनी आपली कला, संस्कृती आणि एकजूट जपत सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणारे गुजर, आगरे आणि चाळके यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच प्रशांत भेकरे, धुमाळी, नरळकर, पेडामकर, पानगले, मुरुडकर, मानसिंग यांच्यासह प्रतिष्ठानच्या सर्व सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाला सरपंच मंगेश शेलार व त्यांच्या पत्नी यांच्यासह विनोद साबळे, रामेश्वर आंग्रे, प्रथमेश पुंडे, प्रीती शहारे, अंजू सिंग, नाथाभाई भारवाड, भरत कार्लेकर आदी मान्यवर उपस्थित होते.रत्नागिरीकर सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून भविष्यातही विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रम राबविण्यात येणार असून, त्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले.

# खतांची मुबलक उपलब्धता; वितरण प्रक्रिया होणार अधिक पारदर्शक

**उरण : वार्ताहर**

कृषी क्षेत्रातत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या उद्देशाने शासनाने उचललेल्या पावलांमुळे शेतकरी आता अधिक 'टेक्नोसेव्ही' होत आहे. रासायनिक खतांची उपलब्धता, ऑनलाइन बुकिंग आणि पारदर्शक वितरण व्यवस्थेसाठी कृषी विभागामार्फत फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ही नवीन ऑनलाइन प्रणाली सुरू करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी एफ एफ एस ॲपवरून खतांची खरेदी करण्याचे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले आहे .




या प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आपल्या भ्रमणध्वनीवरून घरबसल्या आवश्यक खताचे आगाऊ आरक्षण करता येणार आहे. आरक्षण केलेले खत निश्चित कालावधीत जवळच्या अधिकृत विक्रेत्याकडून घेता येणार आहे. शेतकऱ्यांनी मोबाईलवर फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करून घ्यावे. स्मार्टफोनची सुविधा उपलब्ध नसल्यास शेतकऱ्यांना जवळच्या अधिकृत खत विक्रेत्यांकडे बुकिंग करता येणार आहे. या बुकिंगसाठी शेतकरी आयडी, आधार क्रमांक, तसेच जमीन व पिकांची आवश्यक माहिती अपलोड करावी लागणार आहे. बुकिंगनंतर प्राप्त झालेला क्यूआर कोड अथवा टोकन क्रमांक दोन दिवसांसाठी वैध राहणार आहे. या काळात खतांची खरेदी न झाल्यास पुन्हा बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्यांना स्वतः खत घेण्यासाठी उपस्थित राहण्यास अडचण असेल तर त्याच्या वतीने प्रतिनिधीलाही खत खरेदी करता येणार आहे.

या पद्धतीमुळे पिकांच्या गरजेनुसार वेळेत खत उपलब्ध झाल्याने शेतीच्या कामांचे नियोजन करणे अधिक सोपे होणार आहे. दरम्यान शेतकऱ्यांना खतापासून वंचित रहावे लागू नये आणि प्रत्येक शेतकऱ्याला वैयक्तिक खताचा नियमानुसार लाभ प्राप्त व्हावा. या उद्देशाने या प्रणालीची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती कृषी विभाग, गावातील कृषी सखी, सहाय्यक कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा .

## संपादकीय

# जनहिताचा समतोल हवा

अन्न सुरक्षेसाठीच्या कारवाईची अंमलबजावणी कठोर असण्यासोबतच ती स्पष्ट नियम, पारदर्शक प्रक्रिया आणि व्यवहार्य कार्यपद्धती यांच्यासह झाली पाहिजे. सुट्या खाद्यतेलासंदर्भातली फडणवीस सरकारची सध्याची भूमिका हाच समतोल साधण्याचा प्रयत्न आहे.

**राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अलीकडच्या काळात राबवलेल्या धडक कारवाई मोहिमेतून 'सुरक्षित अन्न' हा विषय मोठ्या प्रमाणात चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. त्यांच्या मोहिमेचे हे निश्चितच सकारात्मक फलित आहे. अन्नसुरक्षा हा असा विषय आहे, ज्यात निष्काळजीपणाची किंमत थेट नागरिकांच्या आरोग्याला मोजावी लागते. त्यामुळे अन्नभेसळ, निकृष्ट दर्जा आणि स्वच्छतेतील त्रुटी यांच्या विरोधात कठोर कारवाई आवश्यकच आहे. सुट्या खाद्यतेलाबाबतची त्यांची अलीकडची कारवाई हीदेखील तशीच आहे. अन्न व औषध प्रशासनाने आपल्या संबंधित आदेशात सुटे खाद्यतेल विकण्यास प्रतिबंध करताना सीलबंद, छेडछाड न झालेल्या आणि संपूर्ण माहिती असलेल्या पॅकिंगवर भर दिला. त्यांनी तपासणीसाठी घेतलेल्या नमुन्यांपैकी बहुतांश नमुने मानकांनुसार आढळले. मात्र काही नमुने निकृष्ट, असुरक्षित आणि चुकीच्या पद्धतीने लेबल केलेले असल्याचे समोर आले. स्वस्त तेलाची भेसळ, परवान्याशिवाय व्यवसाय, चुकीचे पुनर्लेबलीकरण, मुदत संपण्याच्या जवळ असलेल्या तेलाचे पुनर्पॅकिंग आणि अयोग्य कंटेनरचा वापर यांसारख्या बाबीही निदर्शनास आल्या. त्यामुळेच मुंढे यांची यासंदर्भातीलही भूमिका केवळ अति कठोर वा टोकाची म्हणून न पाहता, ग्राहकांच्या हक्काच्या दृष्टीनेही तिच्याकडे पाहण्याची गरज आहे. विशेषतः कमी प्रमाणात तेल विकत घेणाऱ्या सामान्य ग्राहकाला तेलाचा स्रोत, तुकडी क्रमांक, पॅकिंगची तारीख किंवा वापराची अंतिम तारीख याची माहिती मिळत नसेल, तर त्याच्या आरोग्याचे संरक्षण कसे होणार? अन्नसुरक्षेचा नियम म्हणजे व्यापाऱ्यांविरोधातील नियम नव्हे. तो ग्राहकांच्या हितासाठी असलेला नियम आहे, मात्र सरकारने या टप्प्यावर दाखवलेला समतोल दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंढे यांच्या अन्नसुरक्षा मोहिमेचे समर्थन करताना अन्नभेसळ आरोग्यासाठी धोकादायक असून जीवाला धोका निर्माण करू शकते असे स्पष्ट केले होते. खाद्यतेलाच्या प्रश्नावर मात्र त्यांनी 'कठोर गुणवत्ता आणि पारंपरिक व्यवसायांचे संरक्षण' या दोन्हींचा समतोल साधण्याची भूमिका घेतली, जी योग्यच आहे. अन्न व औषध प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करताना भेसळ रोखणारी आणि पारंपरिक तेलव्यवसाय सुरू ठेवण्याची शक्यता जपणारी प्रमाणित कार्यपद्धती तयार करावी असा निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. म्हणजेच सरकारचा संदेश स्पष्ट आहे की अन्नाच्या गुणवत्तेशी तडजोड नाही. पण जनजीवन आणि कायदेशीर व्यवसायांच्या व्यवहार्यतेकडेही दुर्लक्ष होता कामा नये. आजवरच्या मुंढे यांच्या मोहिमेचा व्यापक परिणाम नक्कीच दुर्लक्षित करता येणार नाही. उपाहारगृहे, हॉटेल्स, खाद्यविक्रेते, शाळांच्या उपाहारगृहांपासून खाद्यतेलाच्या पुरवठा साखळीपर्यंत तपासण्यांचा वेग वाढला आहे. मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने तीन हजारांहून अधिक ठिकाणी छापे घातल्याचे सांगितले जाते. त्यानंतर काही ठिकाणी स्वच्छतेच्या पद्धती आणि खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये सुधारणा झाल्याचेही दिसून आले आहे. सुरक्षित आणि दर्जेदार अन्नाची मागणी करणे ही भारतात लोकचळवळ बनावी. तरच आपली मोहीम खऱ्या अर्थाने यशस्वी झाली असे आपल्याला वाटेल, असे मुंढे यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. महाराष्ट्रापाठोपाठ आता अन्य राज्यांमध्येही तिथल्या एफडीएकडून शाळांच्या परिसरातील जंक फूड विक्रीविरोधात मोहीम सुरू झाल्याचे दिसते आहे. सरकारची इच्छाशक्ती, प्रशासनाचा काटेकोरपणा आणि नागरिकांची जागरूकता एकत्र आली तर महाराष्ट्रातून सुरू झालेली ही अन्नसुरक्षा चळवळ खऱ्या अर्थाने देशव्यापी लोकचळवळ ठरू शकते.**

# नेत्रदान सामाजिक चळवळ बनवूया!

नेत्रदान ही केवळ एक सामान्य वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवी संवेदनेचे, त्यागाचे आणि सामाजिक जबाबदारीचे एक अत्यंत उदात्त रूप आहे. आपल्या मृत्युनंतरही आपले डोळे या जगात जिवंत राहून कोणाचे तरी आयुष्य उजळवू शकतात, ही भावनाच अत्यंत समाधान देणारी आहे. भारतात दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत 'राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा' साजरा केला जातो. या पंधरवड्याचा मुख्य उद्देश लोकांमध्ये नेत्रदानाबद्दल असलेली भीती आणि गैरसमजांचे निरसन करणे आणि या चळवळीत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे हा असतो. या दिनानिमित्त हा लेख

निसर्गाने दिलेली एक अद्वितीय आणि अमूल्य देणगी म्हणजे मानवी जीवन होय. आपल्या सुंदर आणि संवेदनशील डोळ्यांमुळे या जीवनाचा खऱ्या अर्थाने आनंद घेता येतो. ऋतुचक्राचे बदलणारे विविध रंग, निसर्गाची अद्भूत जादू, सृष्टीचे विलोभनीय सौंदर्य आणि आपल्या प्रियजनांच्या चेहऱ्यावरील हास्य डोळ्यांमुळेच पाहाता येते. डोळे हे केवळ एक अवयव नसून मानवी भावना व्यक्त करण्याचे आणि बाह्य जगाशी नाते जोडणारे मुख्य माध्यम आहेत. परंतु आपण सर्वजण या निसर्गदत्त प्रकाशाचा आनंद घेत असताना नशिबाच्या किंवा वैद्यकीय कारणांमुळे अंधाराच्या सावटाखाली जगत असलेलेही अनेक लोक आहेत. ज्यांच्या आयुष्यात सूर्योदय आणि रात्रीचे चांदणे या दोन्ही गोष्टी केवळ एक न अनुभवलेली संकल्पना आहेत, त्या दृष्टिहीन बांधवांच्या अंधारमय आयुष्यात आशेचा किरण पसरवण्याचा आणि त्यांना पुन्हा हे जग स्वतःच्या डोळ्यानी 'याची देही, याची डोळा' पाहण्याची संधी देण्याचा सर्वोत्तम व पवित्र मार्ग म्हणजेच 'नेत्रदान' हा होय.

आपल्या देशात कॉर्नियल अंधत्व म्हणजेच डोळ्यातील पारदर्शक पटलाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या प्रचंड मोठी आहे. डोळ्यातील पारदर्शक पटलाला (कॉर्निया) कोणत्याही प्रकारची इजा झाल्यामुळे, संसर्ग झाल्यामुळे किंवा कुपोषण व जन्मापासूनच्या दोषांमुळे दृष्टी गमावलेल्या लोकांना 'कॉर्निया प्रत्यारोपण' या सोप्या शस्त्रक्रियेद्वारे पुन्हा दृष्टी मिळवता येते. दुर्दैवाने, भारतात नेत्रदानाची गरज आणि प्रत्यक्षात उपलब्ध होणारे कॉर्निया यांमध्ये एक खूप मोठी तफावत आहे. दरवर्षी देशात लाखांहून अधिक कॉर्नियाची गरज भासते, परंतु प्रत्यक्षात केवळ काही हजार नेत्रदानेच पार पडतात. या दरीमुळे हजारो दृष्टिहीन व्यक्तींना, ज्यांमध्ये लहान मुलांचा आणि तरुण वर्गाचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे, आयुष्यभर अंधारात राहावे लागते किंवा वर्षांनुवर्षे दात्याच्या प्रतीक्षेत राहावे लागते. मृत्यू ही निसर्गाची अटळ घटना आहे. परंतु मृत्यूनंतर आपले हे मौल्यवान अवयव मातीत मिसळून जाण्याऐवजी किंवा अग्नीत भस्म होण्याऐवजी जर कोणाचे निरस आयुष्य प्रकाशमान करत असतील, तर त्याहून मोठे पुण्य कार्य किंवा जिवंतपणाचे लक्षण दुसरे कोणतेही असू शकत नाही.

समाजात नेत्रदानाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असण्यामागे वैद्यकीय सुविधांची कमतरता हे कारण नसून, जनजागृतीचा अभाव आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेले गैरसमज हेच मुख्य कारण आहे. अनेक लोकांना अशी भीती वाटते की नेत्रदान केल्यामुळे मृतदेह विद्रुप दिसेल किंवा अंत्यसंस्कारास विलंब होईल. परंतु हे पूर्णपणे वास्तवविरोधी आहे. नेत्रदानाची प्रक्रिया अतिशय वैज्ञानिक, सुटसुटीत आणि सन्मानपूर्वक केली जाते. प्रशिक्षित डॉक्टरांची तज्ज्ञ टीम मृतदेहाच्या ठिकाणी येऊन अवघ्या १५ ते २० मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण करते. यामध्ये डोळ्यातील केवळ आवश्यक असा कॉर्नियाचा भागच काढला जातो आणि त्या जागी कृत्रिम पटल किंवा कापूस ठेवून पापण्या अत्यंत काळजीपूर्वक बंद केल्या जातात. त्यामुळे चेहऱ्यावर कोणत्याही प्रकारचा डाग किंवा विद्रुपपणा येत नाही. याशिवाय, पुढील जन्मात व्यक्ती अंध जन्माला येईल असा अंधश्रद्धेवर आधारित विचारही समाजातील काही घटकांमध्ये दिसून येतो. वैद्यकीय आणि अध्यात्मिक दोन्ही दृष्टिकोनातून हा विचार पूर्णपणे फोल आहे; उलटपक्षी, मृत्यूनंतर अवयवदान करून दुसऱ्याचे आयुष्य उजळवणे हा सर्वात मोठा धर्म मानला गेला आहे.

नेत्रदान ही अत्यंत संवेदनशील आणि वेळेवर आधारित असलेली प्रक्रिया आहे, म्हणूनच यामध्ये वेळेचे नियोजन सर्वात महत्त्वाचे ठरते. व्यक्तीच्या मृत्युनंतर साधारणपणे चार ते सहा तासांच्या आत नेत्रदान होणे अनिवार्य असते. जितक्या लवकर कॉर्निया काढला जाईल, तितकी त्याची गुणवत्ता उत्तम राहते आणि शस्त्रक्रिया यशस्वी होण्याची शक्यता वाढते. मृत्युनंतर नातेवाईकांनी तत्काळ जवळची नेत्र पेढी किंवा रुग्णालयाशी संपर्क साधणे आवश्यक असते. डॉक्टर येईपर्यंत मृत व्यक्तीचे डोळे उघडे राहू नयेत म्हणून त्यावर ओल्या कापसाच्या पट्ट्या ठेवाव्यात, पंखा बंद ठेवावा आणि डोक्याखाली उशी ठेवून डोके थोडे उंच ठेवावे, जेणेकरून डोळ्यांमधील रक्तप्रवाह नियंत्रित राहतो.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, मृत व्यक्तीने आपल्या हयातीत नेत्रदानाचा संकल्प केला असो वा नसो, मृत्युनंतर त्याच्या निकटवर्तीयांची संमती ही कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या अनिवार्य असते. अनेकदा व्यक्ती हयातीत फॉर्म भरते, परंतु मृत्यूच्या वेळी कुटुंबातील सदस्यांना याबद्दल माहिती नसल्यामुळे किंवा ऐनवेळी घेतलेल्या भावनावश निर्णयामुळे नेत्रदान राहून जाते. म्हणूनच, जर आपण नेत्रदानाचा संकल्प करत असू, तर त्याची स्पष्ट कल्पना आपल्या कुटुंबातील सदस्यांना देणे आणि त्यांना या निर्णयामध्ये सहभागी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

शेवटी नेत्रदान ही केवळ काही डॉक्टरांची किंवा शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून ती एक व्यापक सामाजिक चळवळ बनली पाहिजे. आपण आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे प्रसंग, जसे की वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस किंवा प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नेत्रदानाचा संकल्प करून समाजापुढे एक नवा आदर्श ठेवू शकतो. रक्तदान हे जसे श्रेष्ठदान मानले जाते, तसेच नेत्रदान हे महादान आहे. आपण या जगात नसतानाही आपल्या डोळ्यांच्या माध्यमातून हे जग पाहू शकतो आणि कोणाच्या तरी अंधारमय विश्वात कायमचा प्रकाश पसरवू शकतो. नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने आपण सर्वजण एकत्र येऊ या, अंधश्रद्धा व गैरसमज बाजूला सारूया, नेत्रदानाचा संकल्प करू या आणि इतरांनाही या महान कार्यासाठी प्रेरित करूया.

**–अतुल पांडे,**
सहायक संचालक (माहिती)

# सन आयलाय गो नारली पुनवेचा...

श्रावण महिना सुरू झाला की सणांची रेलचेल सुरू होते. यातीलच एक अत्यंत महत्त्वाचा, निसर्गाशी नाते सांगणारा आणि महाराष्ट्राच्या विस्तीर्ण समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा सण म्हणजे 'नारळी पौर्णिमा'. श्रावण शुद्ध पौर्णिमेला साजरा होणारा हा उत्सव प्रामुख्याने सागरपुत्र म्हणजेच कोळी बांधवांचा सर्वात मोठा सण आहे. या दिवशी अथांग सागराला श्रीफळ (नारळ) अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली जाते.

कोळी बांधवांसाठी समुद्र हे केवळ पाण्याचे अथांग रूप नसून, ती त्यांची 'अन्नदाता' जगण्याची माऊली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला म्हणजेच जून आणि जुलै महिन्यात समुद्र प्रचंड खवळलेला असतो. माशांच्या प्रजननाचा हा काळ असल्याने आणि सुरक्षिततेचा उपाय म्हणून या काळात मासेमारी पूर्णपणे बंद असते. श्रावण पौर्णिमेला समुद्राचा जोर ओसरू लागतो. त्यामुळे पुन्हा समुद्रात उतरण्यापूर्वी, सागरदेवाचा कोप होऊ नये आणि वर्षभर सुरक्षितपणे मासेमारी करता यावी, यासाठी समुद्राची पूजा केली जाते.

नारळी पौर्णिमेच्या दिवशी कोळीवाड्यात अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळतो. कोळी बांधव आणि महिला त्यांचे पारंपरिक आणि रंगीबेरंगी पोशाख परिधान करतात. घराघरांमध्ये आणि बोटींवर पूजा केली जाते. आपल्या लाडक्या नौका म्हणजेच होड्यांना रंगरंगोटी करून, पताका आणि फुलांनी अगदी नववधूसारखे सजवले जाते. दुपारनंतर सजवलेल्या पालखीतून मानाचा सोन्याचा (सोन्याचा वर्ख लावलेला) नारळ ढोल-ताशांच्या आणि कोळीगीतांच्या गजरात समुद्रकिनाऱ्यावर नेला जातो. तिथे विधीवत पूजा करून तो समुद्राला अर्पण केला जातो.

या सणाचे आणखी एक आकर्षण म्हणजे घरोघरी बनणारे नारळाचे चवदार पदार्थ. या दिवशी विशेष रूपाने गोड 'नारळी भात' आणि 'नारळाच्या वड्या' बनवल्या जातात. रात्रीच्या वेळी कोळीवाड्यात लहान-थोर एकत्र येतात. 'सन गो राया' सारख्या पारंपारिक कोळीगीतांच्या तालावर आणि हातांची गुंफण करत केले जाणारे 'कोळीनृत्य' संपूर्ण परिसराला मंत्रमुग्ध करून टाकते.

आजच्या आधुनिक काळातही कोळी बांधवांनी आपली ही सांस्कृतिक परंपरा आणि निसर्ग पूजेचा वारसा जिवंत ठेवला आहे. नारळी पौर्णिमेनंतर समुद्र पुन्हा संथ होतो आणि 'दर्याचा राजा' मोठ्या आशेने, नव्या उत्साहाने आपली जहाजे घेऊन अथांग सागरावर स्वार होतो. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# घड्याळ बनवणाऱ्या ब्रँडची स्मार्टफोन मार्केटमध्ये एन्ट्री

स्मार्टवॉच आणि वेअरेबल्स क्षेत्रात आघाडीवर असलेल्या 'फायर-बोल्ट'च्या 'बोल्ट'या सब-ब्रँडने भारतीय स्मार्टफोन बाजारात अधिकृतपणे पदार्पण केले आहे. कंपनीने बजेट सेगमेंटला लक्ष्य करत आपले पहिले दोन दमदार स्मार्टफोन्स 'Boltt Evo ४G' आणि 'Boltt Ace ५G' लाँच केले आहेत. ब्लोटवेअर-मुक्त क्लीन अँड्रॉइड एक्सपिरियन्स, गुगल एआय कॅमेरा फीचर्स आणि तब्बल ६,००० एमएएच क्षमतेची बॅटरी ही या दोन्ही स्मार्टफोन्सची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.




### व्हेरियंट्स आणि किमती

हे स्मार्टफोन्स १ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजल्यापासून फ्लिपकार्टवर विक्रीसाठी उपलब्ध होतील. लाँच ऑफर अंतर्गत पहिल्या दिवशी खरेदी केल्यास ₹१,०००ची तत्काळ सूट मिळेल.

### डिस्प्ले आणि परफॉर्मन्स

दोन्ही फोन्समध्ये ६.७९ इंचाचा HD+ डिस्प्ले देण्यात आला असून तो १२०Hz हाय रिफ्रेश रेट आणि ६०० निट्स पीक ब्राइटनेसला सपोर्ट करतो. डिस्प्लेवर मध्यभागी पंच-होल कटआऊट मिळतो. Boltt Evo ४Gमध्ये Unisoc T७२५० प्रोसेसर, तर Boltt Ace ५Gमध्ये अधिक वेगवान Unisoc T८२०० चिपसेट देण्यात आला आहे. दैनंदिन वापर, सोशल मीडिया आणि वेब ब्राऊझिंगसाठी हे चिपसेट्स पुरेसे ठरतात.

हे फोन्स थेट Android १६ वर काम करतात. विशेष म्हणजे या बजेटमध्ये पहिल्यांदाच 'Circle to Search' आणि गुगल लेन्ससारखे प्रीमियम फीचर्स यात देण्यात आले आहेत.


### AI कॅमेरा आणि मोठी बॅटरी

Boltt Ace ५Gमध्ये ६४ मेगापिक्सलचा मुख्य रियर कॅमेरा (f/१.८ अपार्चर), तर Boltt Evoमध्ये ५० मेगापिक्सलचा मुख्य कॅमेरा मिळतो. दोन्हीमध्ये सेल्फीसाठी ८ मेगापिक्सलचा फ्रंट कॅमेरा आहे. यात 'Face Unblur' आणि 'Night Mode' सारखे गुगलचे एआय कॅमेरा फीचर्स मिळतात. दोन्ही मॉडेल्समध्ये ६,००० mAhची भलीमोठी बॅटरी आणि १८W फास्ट चार्जिंग सपोर्ट मिळतो. याशिवाय Ace ५Gमध्ये डिजिटल पेमेंटसाठी NFC सपोर्टही उपलब्ध आहे.

# लेखक, नाटककार नारायण धारप

नारायण गोपाळ धारप हे मराठी भाषेतील लेखक, नाटककार होते. प्रामुख्याने भयकथा, गूढकथांकरिता यांची ख्याती आहे. यांनी निर्मिलेले समर्थ हे काल्पनिक पात्र आणि त्यावर आधारित गूढकथा विशेष गाजल्या. आज त्यांचा जन्मदिन आहे. धारपांचा जन्म २७ ऑगस्ट १९२५ रोजी झाला. त्यांनी मुंबई विद्यापीठातून रसायनशास्त्रात बी.एस्सी.टेक पदवी मिळवली.

धारप नोकरीनिमित्त काही काळ आफ्रिकेत वास्तव्यास होते. त्यांनी मराठीत १००हून अधिक पुस्तके लिहिली, प्रामुख्याने भयपट प्रकारातील. धारप यांच्या अनेक कादंबऱ्या आणि कथा स्टीफन किंगसह समकालीन अमेरिकन लेखकांकडून प्रेरित आहेत. शपथ ही किंगच्या IT आणि Gramma (नंतर तुंबाड (चित्रपट) बनलेली)द्वारे प्रेरित कथा होती. नारायण धारप हे एचपी लव्हक्राफ्टचे चतुल्हू मराठी वाचकांसाठी आणणारे पहिले मराठी लेखक होते.




## निमित्त


समर्थ, आप्पा जोशी, कृष्णचंद्र, पंत आणि जयदेव या त्यांच्या कथा किंवा कादंबऱ्यांमध्ये अनेकदा आढळणारी मुख्य पात्रे आहेत. वेगवेगळ्या कथादेखील आहेत, ज्यामध्ये वैयक्तिक नायक/नायिका असू शकतात ज्यांनी परिस्थितीवर मात केली, कधी कधी थोड्या बाह्य मदतीसह, कधीकधी त्याशिवाय. त्याच्या बहुतेक कथा चांगल्या आणि वाईट यांच्यातील एक महान लढाई दर्शवतात, सहसा चांगल्या विजयाने समाप्त होतात. धारप यांच्या काही कथा आणि स्टीफन किंग यांच्या कथांमध्ये काही साम्य आढळते. संदर्भ हवा तथापि, धारप यांच्या कथा मराठी संस्कृती आणि मराठी वाचकांकडून आल्याचे दिसते, त्यामुळे कथानक आणि भूगोल या क्षेत्रामध्ये काही कथांमध्येच साम्य दिसून येते. मराठी साहित्यात इतर प्रकारच्या लेखनाकडे ज्या आदराने पाहिलं जातं तसं अजूनही भयपट लेखनाकडे पाहिलं जात नाही. नारायण धारप बहुतेक मराठी वाचकांना आवडतात ज्यांना हॉरर प्रकारात काही रस आहे. त्यांनी काही खास मौलिक कथांवर आधारित लेखन केले मराठीतील विचित्र कथा, तसेच त्यांनी प्रथमच मराठी भयपट साहित्यात काल्पनिक पौराणिक कथा सादर केल्या.

धारप यांच्या पुस्तकांच्या सामान्य वैशिष्ट्यांमध्ये वाईटावर चांगल्याचा विजय, पुस्तकातील संकल्पनांची उत्पत्ती मराठी संस्कृतीतून, कथेला कोणत्याही प्रकारच्या लैंगिक संदर्भांपासून दूर ठेवणे (कोणत्याही गोष्टींमध्ये हा महत्त्वाचा घटक मानला जातो) लोकप्रिय हॉरर किंवा सस्पेन्स साहित्य), पुस्तके भयपट शैलीची असूनही सामग्रीला 'चांगल्या अभिरुची' विरुद्ध कोणत्याही प्रकारचा त्रास किंवा गुन्ह्यापासून दूर ठेवणे.

१८ ऑगस्ट २००८ रोजी वयाच्या ८२ वर्षी त्यांचा मृत्यू झाला. विधाता महावीर आर्य हा त्यांनी अखेरच्या काळात लिहिलेला कथासंग्रह होता. २०११मध्ये त्यांच्या अनोळखी दिशा या कादंबरीवर आधारित याच नावाची मालिका स्टार प्रवाह वाहिनीवर प्रदर्शित झाली होती. त्यांच्या कथेवरील ग्रहण ही मालिकाही खूप गाजली. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# जास्वंदाचे फुल आरोग्यासाठीही वरदान!

जास्वंदाचे फूल गणपती बाप्पाला प्रिय मानले जाते आणि ते धार्मिक दृष्टिकोनातून फार महत्त्वाचे आहे, पण या फुलाचे फायदे केवळ तेवढेच मर्यादित नसून ते आरोग्य आणि सौंदर्यासाठीही उपयुक्त आहे. जास्वंदाचे फुल सगळीकडे मिळते, अगदी आरामात उपलब्ध होते. ही फुल जेवढे सुंदर तेवढेच फायदेशीर आहे.



जास्वंदामध्ये भरपूर प्रमाणात अ‍ॅण्टी ऑक्सिडंट्स, फ्लॅव्होनॉइड्स, कॅरोटीनॉइड्स आणि जीवनसत्त्व 'सी' असते, जे शरीरातील हानिकारक घटकांशी लढतात आणि पेशींना त्रास होऊ देत नाहीत. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत राहते. जास्वंदाच्याच फुलांचा चहा प्यायला जातो. हा चहा नियमित घेतल्यास रक्तातील कोलेस्टेरॉल कमी होऊन हृदयाचे आरोग्य सुधारते तसेच हा चहा रक्तदाब संतुलित ठेवतो. त्यामुळे उच्च रक्तदाब असलेल्या लोकांसाठी हा नैसर्गिक उपाय फार फायद्याचा ठरतो.

जास्वंदाच्या फुलांचा अर्क महिलांसाठी विशेष फायदेशीर आहे. मासिक पाळीतील अनियमितता, पोटदुखी आणि अस्वस्थता कमी करण्यासाठी याचा उपयोग केला जातो. यामध्ये असलेले गुणधर्म हार्मोन्सचे संतुलन साधतात. त्याचबरोबर शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी जास्वंदाचा काढा उपयुक्त मानला जातो. पचनक्रिया सुरळीत ठेवणे, यकृताचे आरोग्य सुधारवणे आणि मूत्रविकारांवर आराम देणे यासाठीही हे फूल उपयुक्त ठरते.

सौंदर्याच्या दृष्टीने पाहिले तर जास्वंद हे एक वरदानच आहे. याच्या पाकळ्या वाटून चेहऱ्यावर लावल्यास त्वचेवरील डाग, पिंपल्स आणि काळेपणा कमी होतो. त्वचेला नैसर्गिक ओलावा मिळतो आणि ती अधिक तजेलदार दिसते. केसांसाठी तर जास्वंद खूपच फायदेशीर आहे. याच्या फुलांचा रस किंवा तेल वापरल्यास केस गळणे थांबते. कोंडा कमी होतो आणि केसांची वाढ जलद होते. टाळूतील रक्ताभिसरण सुधारल्यामुळे केस दाट आणि मजबूत होतात.

अशा प्रकारे जास्वंद फक्त वाहण्यासाठी नाही तर त्वचेसाठी आणि केसांसाठीही वापरा. त्याचे फायदे भरपूर आहेत. आरोग्यासाठीही हे फुल फायद्याचे आहे. नैसर्गिक उपाय करणे जास्त फायद्याचे ठरते. जास्वंदाच्या फुलाचा काढा करणे अगदी सोपे आहे. फुले पाण्यात उकळवून पिणे फायद्याचे ठरते. हे उपाय नक्की करून पाहा.

# जांभुळपाड्यात विद्युत तार तुटून दोन कुत्र्यांचा मृत्यू; आजी, दोन नातवंडे थोडक्यात बचावली



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील तलाठी कार्यालयाकडून दलव्यातळीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर सोमवारी, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे पावणेआठ वाजण्याच्या सुमारास, सुरू असलेली विद्युत वाहिनी अचानक तुटून रस्त्यावर कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेत दोन कुत्र्यांचा जागीच मृत्यू झाला. सुदैवाने याच मार्गाने शाळेसाठी निघालेली एक आजी आणि तिचे दोन नातवंडे थोडक्यात बचावल्याने मोठा अनर्थ टळला.

दलव्यातळी येथील दोन शालेय विद्यार्थी आपल्या आजीसोबत शाळेसाठी निघाले होते. त्यांच्यामागे नेहमीप्रमाणे दोन कुत्रीही चालत होती. त्याचवेळी अचानक सुरू असलेली विद्युत तार तुटून रस्त्यावर पडली. आजी व दोन्ही नातवंडे तार पडलेल्या ठिकाणापासून पुढे गेल्याने ते बचावले. मात्र त्यांच्या मागून येणाऱ्या दोन्ही कुत्र्यांच्या अंगावर ही विद्युत तार पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या विद्युत वाहिनीची अवस्था धोकादायक असल्याबाबत यापूर्वी संबंधितांकडे तक्रार करण्यात आली होती, मात्र त्याची वेळीच दखल घेऊन दुरुस्ती करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. वेळेत विद्युत वाहिनीची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात आली असती, तर ही दुर्घटना टाळता आली असती, अशी नाराजीही ग्रामस्थांनी व्यक्त केली.

या घटनेबाबत ग्रामस्थ ज्ञानेश्वर कदम यांनी सांगितले की, "विद्युत वाहिनी धोकादायक अवस्थेत असल्याबाबत यापूर्वी संबंधितांकडे तक्रार करण्यात आली होती. मात्र त्याची वेळीच दखल घेऊन दुरुस्ती करण्यात आली नाही. आज सकाळी सुरू असलेली विद्युत तार अचानक रस्त्यावर तुटून पडली आणि दोन मुक्या प्राण्यांचा जागीच मृत्यू झाला. सुदैवाने त्या वेळी आजी आणि तिचे दोन नातू त्याच रस्त्याने जात होते; मात्र ते थोडक्यात बचावले. हीच तार त्यांच्या अंगावर पडली असती तर मोठी जीवितहानी झाली असती. त्यामुळे महावितरणने या घटनेची गंभीर दखल घेऊन जांभुळपाड्यासह परिसरातील सर्व विद्युत वाहिन्यांची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी. भविष्यात अशा दुर्घटनांमध्ये कोणत्याही नागरिकाचा जीव धोक्यात येणार नाही, यासाठी महावितरणने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे."

## डॉ. साजिद शेख यांची कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कारासाठी निवड



**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा, येथील प्राचार्य डॉ. साजिद फकीरमहंमद शेख यांची "कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार २०२६" साठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेतर्फे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याअंतर्गत हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार समितीने प्रस्तावाची छाननी करून डॉ. साजिद शेख यांच्या नावाची गुणवंत पुरस्कारासाठी निवड केली आहे.शनिवार, २९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय, कलंबोली, येथे मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या उल्लेखनीय निवडीबद्दल कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे तसेच महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे पदाधिकारी यांचे आभार व्यक्त करतअंजुमन चे पदाधिकारी, चेअरमन, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विविध क्षेत्रांतून डॉ. साजिद शेख यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## रेवदंडा येथे पाईपलाईन फुटून हजारो लिटर पाणी वाया

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पागार मोहल्ला येथे गेल्या महिन्यात पाईप लाईन फुटून आजतागायत हजारो लिटर पाणी वाया गेले असल्याचा आरोप सामाजीक कार्यकर्ते सलिमभाई तांडेल यांनी केला आहे. शिवाय संबधीताकडे तक्रार करून सुध्दा दुर्लक्ष होत असल्याने संप्तत प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.



उमटे पाणी पुवठा योजनेअंतर्गत पाणी पुरवठा पाईप लाईन व्दारे पागार मोहल्ला येथे घरोघरी होत आहे, येथील चौकात मिठकर गल्लीत गेल्या महिन्यापासून या पाणीपुरवठयाची पाईल लाईन फुटली आहे, व या फुटलेल्या पाईप लाईन मधून हजारो लिटर पाणी आजतागायत वाया गेले असल्याचे स्थानिक रहिवाशी व सामाजीक कार्यकर्ते सलिमभाई तांडेल यांनी सांगितले. सदर फुटलेल्या पाईप लाईन बाबत संबधीताकडे तक्रार करून सुध्दा दुर्लक्ष केले जात असल्याने त्यांनी संप्तत प्रतिक्रिया व्यक्त केली. सदर फुटलेल्या पाईप लाईन मधून गेल्या महिन्यापासून पाणी वाहत आहे, व सदर पाणी वाहत असल्याने परिसर चिखलमय झाला असून जा-ये करणारे पादचारी, वाहने यांना सुध्दा यामधूनच वाटचाल करावी लागते.

गेल्या महिन्यापासून सदर पाईपलाईन फुटून पाणीवाया जात आहे. संबधीताकडे याबाबत तक्रार करून सुध्दा दुर्लक्ष केले जात आहे, निदान वाहत असलेले पाणी तात्पुरते बंद तरी करावे जेणेकरून पाणी वाया जाणार नाही अश्यारितीने पाणी वाया जात असल्याने उन्हाळयांत पाण्याची टंचाईची समस्या नित्याची आहे. मात्र संबधीत याबाबत कोणतीही ठोस भुमिका न घेता, विनाकारण पाणी वाया घालवित असल्याचे चित्र दिसते आहे.

## महागावच्या ग्रामसभेत रस्त्यांच्या दुरवस्थेवर चर्चा

**तळा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत महागावच्या ग्रामसभेत नागरिकांनी विनवली फाटा ते कोरखंडा फाटा रस्त्याची चाळण झाल्याने ठराव घेऊन बांधकाम विभागावर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

ग्रुप ग्रामपंचायत महागाव येथे दिनांक २४ ऑगस्टच्या ग्रामसभा मध्ये प्रशासक श्रीम. नेरकर यांच्या अध्यक्षते खाली सभा घेण्यात आली. या सभेत आयत्यावेळच्या विषयवार चर्चा करताना विनवली फाटा ते कोरखंडा फाटा या रस्ताची अतिशय दयनीय अवस्था झाली असून या रस्त्यासंदर्भात अनेक वेळा पंचायत समिती तळा व उपविभागीय बांधकाम विभाग (अधिकारी )माणगांव यांच्याशी मागील ३ वर्ष पत्र व्यवहार केला परंतु त्याला केराची टोपली दाखवली असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



या रस्त्यावरून इंदापूर कोरखंडा एस टी जात असून अनेक वेळा रस्त्याच्या दुरावस्थेमुळे बंद केली जाते. त्याचबरोबर रस्त्याच्या दयनिय अवस्थेमुळे बांधकामाचे व इतर साहित्य आणणे. विविध कामांसाठी टेम्पो व इतर गाड्या भाडयानी आणाव्या लागत असून त्याचे भाडे दुप्पट झाले आहेत. या रस्त्यावरून एखादा आजारी रूग्ण अथवा गर्भवती स्त्रीला डॉक्टरांकडे न्यायचे म्हणजे त्यांची अवस्थाच खड्ड्यांमुळे त्रासदायक होईल.या रस्त्यामुळे केव्हाही अपघात होण्याचा धोका आहे.

थोड्याच दिवसांत गणेशोत्सव, सण उत्सव आले आहेत .त्यामुळे या सभेमधे सर्वपक्षीय कार्यकर्ते व सर्व ग्रामस्थ यांनी ठराव केला असून पुढील ४ दिवसात बांधकाम खात्याने रस्त्याची दुरुस्ती केली नाही तर बांधकाम विभागावर धरणे करण्याचा इशारा दिला असून जो पर्यंत खड्डे भरत नाहीत तो पर्यंत आंदोलन चालू राहील असा इशारा ग्रामस्थनी दिला आहे.या रस्त्यावर महागाव,बहुलेवाडी,महागाव आदिवासी वाडी,बारपे,महुरे,कोरखंडे, आदी गावे येतात.

## म्हसळा ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी व वितरण शिबिर

### तालुक्यातील तब्बल ४७ दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

**म्हसळा : रामप्रहर वृत्त**

म्हसळा शहर व तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी व वितरण शिबिर २५ ऑगस्ट रोजी म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयात मोठ्या उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडले. शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ दिव्यांगांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दिव्यांग व्यक्तींना शासकीय सवलती, शैक्षणिक व आर्थिक सवलती तसेच विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी अधिकृत दिव्यांग प्रमाणपत्र अत्यंत आवश्यक असते. या पार्श्वभूमीवर आयोजित या शिबिराला तालुक्यातील दिव्यांग बांधव-भगिनींचा उत्तम प्रतिसाद लाभला असून, एकूण ४७ दिव्यांग नागरिकांनी आपली उपस्थिती नोंदवून तपासणी करून घेतली.



या शिबिरासाठी जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथून आलेल्या विशेष वैद्यकीय तज्ज्ञांच्या पथकाने उपस्थितांची सखोल तपासणी केली. पात्र लाभार्थ्यांना तत्काळ पुढील प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले, ज्यामुळे रुग्णांना अलिबाग येथे जाण्याचा त्रास वाचून मोठी सोय झाली आहे.

शिबिर यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर आयोजक शाहनवाज शाहिद उकये यांनी उपस्थित सर्व वैद्यकीय पथक, ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी, सहकार्य करणारे सर्व मान्यवर आणि उत्स्फूर्त प्रतिसाद देणाऱ्या सर्व दिव्यांग बांधव-भगिनींचे मनःपूर्वक आभार मानले.

## कोलमांडलेतील छोट्याशा वडापावच्या टपरीला तब्बल ५,०५० रुपयांचे वीजबिल

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

राज्यात एकीकडे स्मार्ट मीटरवरून वाद पेटलेला असतानाच, श्रीवर्धन तालुक्यातील कोलमांडले गावात महावितरणचा आणखी एक धक्कादायक कारभार समोर आला आहे. अवघ्या ६ बाय ८ फूट आकाराच्या एका छोट्याशा वडापावच्या टपरीला तब्बल ५,०५० रुपयांचे वीजबिल पाठवण्यात आल्याने टपरीधारक मारुती गोविंद पड्याळ पुरते हवालदिल झाले आहेत.




संबंधित टपरीमध्ये केवळ दोन लहान एलईडी बल्ब (तेही सायंकाळी ६ ते ९:३० या वेळेत) आणि एक घरगुती छोटा फ्रीज सुरू असतो. टपरीतील आईस्क्रीमचा फ्रीज जून महिन्यापासून पूर्णपणे बंद आहे. असे असताना महावितरणने जून महिन्यात तब्बल ३४४ युनिटचा वापर दाखवून ५,०५० रुपयांचे देयक हातात टेकवले आहे. मे महिन्यात १५०० रुपये आलेले बिल एकाच महिन्यात थेट पाच हजारांवर पोहोचल्याने हा 'स्मार्ट मीटरचा चमत्कार' आहे की महावितरणचा गोलमाल, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

वाढीव बिलाबाबत मारुती पड्याळ यांनी महावितरण कार्यालयात धाव घेऊन मीटरची तांत्रिक तपासणी व रीडिंग पडताळणीसाठी लेखी अर्ज दिला. मात्र, अर्जाची दखल घेऊन चौकशी करण्याऐवजी "बिल तर भरावेच लागेल" असा अघोरी सल्ला कर्मचाऱ्यांकडून देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

ग्रामीण भागात स्मार्ट मीटर बसवल्यापासून अवाजवी बिलांचा सुळसुळाट झाला असून, महावितरण केवळ वसुलीसाठी गरीब आणि लघु व्यावसायिकांची पिळवणूक करत असल्याची भावना कोलमांडले परिसरात पसरली आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दिलासा न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

**आमच्या टपरीत दोन बल्ब आणि एकच छोटा फ्रीज सुरू असताना ३४४ युनिट वीज कशी खर्च होऊ शकते? एवढा आमचा रोजचा व्यवसायही नाही. एवढं बिल भरणे आमच्यासारख्या छोट्या व्यावसायिकाच्या अवाक्याबाहेर आहे. प्रशासनाने बिलाची योग्य पुनर्तपासणी करून न्याय द्यावा.**

**-मारुती पड्याळ,**
टपरीधारक, कोलमांडले



**मुरूड : मासेमारी सुरू झाल्याने राजपुरी कोळीवाड्यातील कोळी बांधव छोट्या बोटीवर जातात, तर महिला किनाऱ्यावरील कामे करतात. जाळी साफ करणे, मिळालेली मासळी बाजारात विकणे अशा कामात महिलावर्ग मग्न असतो.** (छाया : सुधीर नाझरे)


**रोहा अष्टमी नगर परिषद**

ता. रोहा, जि.रायगड पिन कोड नं. ४०२१०९
फोन नं. कार्यालय - ०२१९४/२३५७३७ फॅक्स नं. ०२१९४/२३४०७८
email : rohanagarpalika@gmail.com

क्र.रोनप/प्रशासन/ई-नि.सु.-०३१ / १४६८/२०२६-२७, दिनांक - २५/०८/२०२६

**रोहा अष्टमी नगर परिषद**
**ई-निविदा सूचना**

रोहा नगरपरिषदेस ०१ अग्निशमन वाहन व अग्निशमन साहित्य खरेदी करणे (Fire Water Tender १६ ton) आणि रोहा नगरपरिषदेस ०१ अग्निशमन वाहन व अग्निशमन साहित्य खरेदी करणे (Fire Water Tender ०७ ton) या कामासाठी योग्य त्या वर्गात नोंदणीकृत अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपुर्ण निवीदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा नोटीस, प्रसिध्दी, सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक इत्यादी माहीती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७-०८-२०२६ सकाळी ११.०० वाजले पासून उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(अयजकुमार एडके)** | **(वनश्री अवनी समीर शेडगे)** |
| **मुख्याधिकारी** | **नगराध्यक्षा** |
| **रोहा अष्टमी नगर परिषद** | **रोहा अष्टमी नगर परिषद** |

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा!

## नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांचे आवाहन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आपले नवी मुंबई शहर शांतताप्रिय असून यावर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणशील व प्लास्टिकमुक्त साजरा करण्यासाठी प्रत्येकाने कर्तव्य भावनेने आपले योगदान द्यावे असे सांगत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक देखावे करा, आरोग्य व संस्कृती संवर्धक उपक्रम राबवा आणि चांगल्या गोष्टींची जनजागृती करा असे आवाहन नवी मुंबईकर नागरिकांना केले.

यावर्षी १४ सप्टेंबर पासून सर्वत्र गणेशोत्सव साजरा होत असून या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस व संबंधित प्राधिकरणे यांची श्रीगणेशोत्सव मंडळांसमवेत पूर्वतयारी नियोजन बैठक महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.यावेळी उपस्थित ७५ हून अधिक गणेशोत्सव मंडळाच्या प्रतिनिधींनी काही सूचना केल्या. याबाबत तत्परतेने कार्यवाही करण्याचे निर्देश महापौर व आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. सर्वांनी परस्पर सहयोगाने यावर्षीचा गणेशोत्सव उत्साहात आणि नियोजनबद्ध रितीने साजरा करूया असा निश्चय व्यक्त केला.

याप्रसंगी महापौर सुजाता पाटील यांच्यासह महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सभापती गिरीश म्हात्रे, नगरसेवक विशाल विचारे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, परिमंडळ २ उपआयुक्त संजय शिंदे, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे तसेच विविध प्राधिकरणांचे अधिकारी आणि गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उत्सवादरम्यान नागरिकांना कोणत्याही अडचणीमध्ये संपर्कासाठी एक दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून द्यावा व त्या दूरध्वनीवरून सर्व प्राधिकरणांशी संपर्क साधता येईल अशी व्यवस्था करावी असे निर्देश महापौर महोदयांनी दिले. रस्ते दुरुस्ती तसेच स्पीडब्रेकरवर पट्टे मारण्यास प्राधान्य द्यावे त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर नागरिक दर्शनासाठी घराबाहेर पडत असल्याने वाहतूक कोंडी होणार नाही अशा प्रकारे पार्किंग व्यवस्थेचे नियोजन करावे असेही महापौरांनी सूचित केले. विसर्जनाच्या मिरवणुकीसाठी मार्ग नियोजन करावे व त्या मार्गातील झाडांच्या फांद्यांची व्यवस्थित छाटणी करावी आणि केबलचा अडथळा होणार नाही याचीही काळजी घ्यावी अशाही सूचना यावेळी करण्यात आल्या.

महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी मंडळांशी संवाद साधताना गणेशोत्सव पर्यावरणपूरक व प्लास्टिकमुक्त साजरा करण्याचे आवाहन केले. महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आवश्यक परवानग्यांकरिता एक खिडकी योजना करण्यात आली असून त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन केले. यावर्षीही मंडळांकडून परवानग्यांसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही असेही त्यांनी सांगितले.


अनधिकृत बॅनर्समुळे शहर विद्रूप होते व कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो यादृष्टीने मंडळांनी मर्यादित प्रमाणात व निश्चित केलेल्या जागी परवानगी घेऊनच बॅनर प्रदर्शित करावे असे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले. मंडळांतर्फे आयोजित कार्यक्रमांमध्ये आरोग्यविषयक उपक्रमांवर भर द्यावा तसेच मंडपांमध्ये ओला व सुका कचरा संकलनासाठी दोन स्वतंत्र डब्यांची व्यवस्था करावी असेही आवाहन त्यांनी केले. पर्यावरणपूरक दृष्टिकोन जपून शाडूच्या मातीच्या मूर्ती आणाव्यात तसेच सहा फुटापर्यंतच्या मूर्ती न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या कृत्रिम विसर्जन तलावातच विसर्जित कराव्यात असेही आयुक्तांमार्फत सांगण्यात आले.

अभियांत्रिकी विभागामार्फत सर्व विसर्जन स्थळांवर आवश्यक व्यवस्था ठेवण्यात आली असून १५० हून अधिक कृत्रिम विसर्जन तलाव निर्माण करण्यात येत असल्याची माहिती शहर अभियंता शिरीष आरदवाड यांनी दिली.

**नवी मुंबई महापौर गणेशदर्शन स्पर्धा २०२६**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी 'नवी मुंबई महापौर गणेशदर्शन स्पर्धा २०२६' आयोजित करीत असून यावर्षी घरगुती गणेशोत्सवासाठीही विशेष कॅटेगरी ठेवण्यात येत असल्याचे महापौरांनी सांगितले. त्याचप्रमाणे मूर्तीच्या उंचीवरून मंडळांमध्ये होणारी स्पर्धा टाळून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने 'मूर्ती लहान पण भावना महान' असे एक वैशिष्ट्यपूर्ण पारितोषिक या स्पर्धेंतर्गत लहान मूर्ती आणणाऱ्या सार्वजनिक मंडळांसाठी देण्यात येईल असे महापौर सुजाता पाटील यांनी जाहीर केले.

# नवी मुंबईतील पाणीकपात रद्द



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या मोरबे धरणातील पाण्याचा साठा नियंत्रित व सुरक्षित ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने पाणी कपातीचा निर्णय घेतला होता. मोरबे धरण क्षेत्रात समाधानकारक झालेला पाऊस आणि आगामी येणारे उत्सव पाहता नागरिकांना पाणी टंचाई भेडसावू नये, यासाठी ५ सप्टेंबर रोजी दहीहंडी उत्सवापासून लागू करण्यात आलेली पाणी कपात रद्द करण्याच्या सूचना नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी प्रशासनाला केल्या आहेत. त्यामुळे नवी मुंबईकरांना २४ तास पाणी मिळणार असल्याने उत्सवाच्या काळात दिलासा मिळणार आहे.

सीबीडी बेलापूर येथील नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्री गणेशोत्सव-२०२६ च्या नियोजनासाठी मंगळवार २५ ऑगस्ट रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत महापौर सुजाता पाटील यांनी पालिका प्रशासनाला आदेश दिले आहेत.

नवी मुंबई शहरात मोरबे धरणातील पाणी पातळीचे नियोजन करण्यासाठी २५ मे २०२६ पासून १० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली होती. जून महिन्याच्या अखेरपर्यत पावसाने हजेरी न लावल्याने सर्वांचीच धाकधूक वाढली होती. शहराला पाणी पुरवठा करण्याच्या अनुषंगाने पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी जलनियोजनावर भर देत उपाययोजना केल्या होत्या. त्यानुसार पिण्याच्या पाण्याचा वापर केवळ अत्यावश्यक गरजांसाठी राखून ठेवणे. वाहन धुलाई केंद्रांचा पाणीपुरवठा बंद करणे, व्यावसायिक आस्थापनांच्या पाणीपुरवठ्यात कपात, अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई आणि पर्यायी जलस्रोतांचा वापर करणे आणि १० टक्के पाणी कपातीवर लक्ष केंद्रीत केले होते.

# पानिपत महोत्सव सुरू करावा

## नवी मुंबईचे माजी उपमहापौर कौशिकांची मागणी



**नवी मुंबई : बातमीदार**

हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्या नेतृत्वात मंत्री राव नरबीर सिंह यांच्या उपस्थितीमध्ये मुंबईतील बांद्रा येथे हॉटेल ताज लैंड्स एंडमध्ये " हैपनिंग हरियाणा" कार्यक्रम दि. २३ ऑगस्ट रोज़ी साजरा करण्यात आला होता.या कार्यक्रमामध्ये हरियाणाच्या ६०० ते ७०० प्रमुख व्यापा-यांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात नवी मुंबईचे माजी उपमहापौर व भाजपाचे समाजसेवक अनिल कौशिक यांनी हरियाणात पानीपत येथे दर वर्षी महाराष्ट्र व हरियाणा संस्कृती" जोडण्यासाठी पानीपत महोत्सव साजरा करण्याची मागणी केली. तसेच पानीपत येथे "मराठा युद्ध स्मृति" शोर्य स्थळ निर्माण करण्याची मागणी केली. यासोबत नवी मुंबईत हरियाणा व महाराष्ट्र या दोन राज्यांत व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्नकरणाबाबत कौशिक यांनी सुचविले. तसेच इतर राज्यातील भावनांप्रमाणे हरियाणाच्या नागरिकांना नवी मुंबई, मुंबईत आल्यावर थांबता यावे यासाठी सिडकोकडून भुखंड घेऊन "हरियाणा भवन" निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे भुखंडाची मागणी करण्याची विनंती कौशिक यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.



# स्व. आनंद दिघे यांना अभिवादन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

धर्मवीर स्व. आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कामगार नेते रवींद्र सावंत यांच्या नेरूळ सेक्टर २ येथील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात आज विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी स्व. दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी उपशहर प्रमुख अशोक मुंगसे, तुकाराम काळे, गजानन टाले, अण्णा म्हात्रे, संजय गुंजाळ, महादेव जाधव यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कुल उलवे येथे लायन्स क्लब ऑफ कामोठे यांच्या सौजन्याने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरात MGM डेंटल हॉस्पिटल अँड कॉलेज तसेच श्री रामकृष्ण नेत्रालय, नेरुळ यांच्या तज्ज्ञ पथकाने सहभाग घेतला. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची दंत तपासणी, नेत्र तपासणी तसेच BMI (Body Mass Index) तपासणी करण्यात आली.



दंत तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांना दातांची योग्य निगा, नियमित स्वच्छता आणि मौखिक आरोग्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नेत्र तपासणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची प्राथमिक तपासणी करून डोळ्यांच्या आरोग्याबाबत सूचना देण्यात आल्या. तसेच BMI तपासणीद्वारे विद्यार्थ्यांच्या शारीरिक आरोग्याशी संबंधित प्राथमिक माहिती घेण्यात आली.

या आरोग्य तपासणी शिबिरामुळे विद्यार्थ्यांना आरोग्याची नियमित तपासणी, स्वच्छतेच्या सवयी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजण्यास मदत झाली. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमाचा लाभ घेतला.

# उरण महाविद्यालयात मासिक पाळीविषयक जनजागृती कार्यक्रम



**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ, उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील महिला विकास कक्ष (WDC) आणि श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीविषयक जनजागृती, आरोग्य-स्वच्छता, सकारात्मक दृष्टिकोन आणि सक्षमीकरण या विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.

आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींना मासिक पाळीविषयी शास्त्रीय व योग्य माहिती देणे, स्वच्छतेच्या सवयींबाबत जागरूक करणे तसेच आरोग्यविषयक गैरसमज दूर करून आत्मविश्वास वाढविणे हा होता.

कार्यक्रमासाठी डॉ. दया परदेशी (B.A.M. S., M.D. (Ayu), PGDEMS, DYA, आयुर्वेदिक कन्सल्टंट), डॉ. निशा ओव्हाळ (होमिओपॅथी कन्सल्टंट) आणि श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्थेच्या अध्यक्षा संगिता ढेरे यांनी विद्यार्थिनींना मासिक पाळीशी संबंधित आरोग्य, स्वच्छता आणि आवश्यक काळजी याबाबत मार्गदर्शन केले. मासिक पाळीविषयी असलेले गैरसमज दूर करून योग्य आरोग्यविषयक माहितीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. ए. आर. कांबळे तसेच WDC सदस्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी महाविद्यालयातील वरिष्ठ व सहकारी प्रा. वाणिज्य विभागप्रमुख व्ही. एस. इंदलकर यांनीही विद्यार्थिनींना आरोग्य व स्वच्छतेसंदर्भात मार्गदर्शन केले.

'माहितीपूर्ण महिला, निरोगी महिला आणि सक्षम महिला' हा संदेश या कार्यक्रमातून विद्यार्थिनींपर्यंत पोहोचविण्यात आला. महिलांच्या आरोग्याशी संबंधित विषयांवर खुलेपणाने चर्चा होणे आणि वैज्ञानिक माहिती उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

कार्यक्रमाची प्रस्तावना व पाहुण्यांचे स्वागत डॉ. हन्नत शेख यांनी केले, तर आभार विनिता तांबे यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील महिला विकास कक्षाच्या सदस्यांसह श्री समर्थ कृपा सखी स्वयं सहाय्यता संस्थेच्या कविता म्हात्रे, मीना रावल व शबाना खान आदी उपस्थित होते.

मासिक पाळीविषयी जनजागृती ही केवळ आरोग्याची नव्हे, तर महिलांच्या सन्मान, आत्मविश्वास आणि सक्षमीकरणाचीही बाब आहे, असा सकारात्मक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# छायाचित्रण अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणास उरण महाविद्यालयात सुरुवात



**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, उरण-रायगड येथे फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच Department of Lifelong Learning & Extension (DLLE) आणि Department of Geography यांच्या सहकार्याने फोटोग्राफी अभ्यासक्रमाचा ओरिएंटेशन कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला.कार्यक्रमासाठी प्रसिद्ध छायाचित्रकार व पद्मश्री पुरस्कारप्राप्त सुधाकर ओलवे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना फोटोग्राफीचे महत्त्व, छायाचित्रणातील विविध संधी, तंत्रज्ञानाचा वापर तसेच फोटोग्राफी या कौशल्याधारित क्षेत्रातील करिअरच्या संधी याबाबत मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक व्ही. गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यपक व शिक्षकेतर कर्मचारी यांना कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

फोटोग्राफीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळवून देणारा आणि त्यांना व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रेरणा देणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हा अभ्यासक्रम दर शनिवारी महाविदयालयामधे घेण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. डी.पी. हिंगमिरे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. ए. के. गायकवाड यांनी केली व पाहुण्याचे स्वागत डॉ. ए.आर कांबळे यांनी केले व आभार जेष्ठ व सहयोगी प्रा. वाणिज्य विभाग प्रमुख वि.एस इंदुलकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व प्रशिक्षणास प्रवेश घेतलेले विद्यार्थी उपस्थित होते.

# आरोग्यदूत प्रशांत भोर यांचा सन्मान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथील श्री गणेश सोसायटी येथील प्रशांत बबन भोर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मानवतेची अनोखी सेवा जपली आहे. कॅन्सरग्रस्त रुग्णांसाठी तब्बल ११३ वेळा प्लेटलेट्स व प्लाझ्मा दान, तसेच २४ वेळा रक्तदान करून त्यांनी असंख्य गरजू रुग्णांना मदतीचा हात दिला आहे. या उल्लेखनीय समाजकार्याची दखल घेत पुणे जिल्हा रहिवासी संघ, नवी मुंबई यांच्या वतीने त्यांना 'आरोग्यदूत' म्हणून सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. मंगेश आमले , बाबाजीशेठ इंदोरे,बाळासाहेब जरे, अरुणशेठ कोरडे,रवीशेठ ढोबळे, अमोल टेमकर, किशोर दांगट,तानाजीशेठ बोलावे ,श्रीकांत लाडके आदी मान्यवर उपस्थित होते. मृत्यूनंतर अवयवदान व देहदानाबाबत जनजागृती करण्याचेही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या प्रेरणेतून दोन व्यक्तींनी मृत्यूनंतर कोणतेही विधी न करता आपले शरीर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी दान केले. त्यांच्या या कार्यामुळे अंध व्यक्तींना दृष्टी मिळण्यासाठी डोळे तसेच जळीतग्रस्तांसाठी त्वचा उपलब्ध झाली. स्वतःही त्यांनी देहदानाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे.

गेली २५ वर्षे आदिवासी भागात सातत्याने कार्य करताना त्यांनी मेडिकल कॅम्प, दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमाला, तसेच रोजगारासाठी आदिवासी बांधवांना फळझाडांचे वाटप अशा विविध माध्यमातून समाजसेवा केली आहे. आजही उपचारासाठी नवी मुंबईत येणारे अनेक आदिवासी बांधव त्यांच्या घरी हक्काने राहतात व जेवण करून जातात, ही त्यांच्या सेवाभावी वृत्तीची खरी ओळख आहे.



राम प्रहर

## निसर्गचक्र

आभाळ फाटले कोण लावणार ठिगळ
प्रत्येकजण छत्री कोटाने झाकती आपले टकूर
धरती मात्र कायम सहन करते त्याचा मार
कारण काही झाले तरी ते आहे तिचा यार

याच्या माराने ती होते बेभान
करीते त्याचे स्वागत हिरवे हिरवे वस्त्र नेसून
याशिवाय त्याच्या मिलनाने होते गर्भवती
आणि त्यातून अन्नधान्यांचे अंकुर फुटती

या अंकुरातून समस्त सृष्टीचे होते उदरभरण
आणि सर्वांचे होते पालन पोषण
म्हणूनच कितीही त्रास दिला त्याने
तरी सर्व जण वाट पाहती त्याची आतुरतेने

हे निसर्गचक्र नियमित राहण्या
आपण लावावा हातभार
करूनी निसर्ग नियमांचे पालन
उतराई व्हावे त्याच्या ऋणातून



-विनायक हसराज
पनवेल

# लव्हेज गावचा पाणीपुरवठा पूर्ववत

## खोपोली नगरपालिकेची कार्यवाही

**खोपोली : प्रतिनिधी**

गेल्या आठवडाभरापासून पाणीपुरवठा खंडित झाल्याने त्रस्त झालेल्या लव्हेज गावातील ग्रामस्थांना अखेर दिलासा मिळाला आहे. खोपोली नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी रात्रभर अथक परिश्रम घेत आयओसी पुलाजवळील पाईपलाईनचे लिकेज शोधून काढले. पहाटेपर्यंत सुरू असलेल्या दुरूस्तीच्या कामानंतर बुधवारी (दि.२६) पहाटे पाच वाजल्यापासून गावातील पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत सुरू झाला.



लव्हेज गावातील पाणीपुरवठ्याची समस्या गेल्या अनेक महिन्यांपासून कायम होती. याबाबत ग्रामस्थांनी वारंवार आवाज उठवून स्थानिक आमदारांकडेही ही समस्या मांडली होती. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी लव्हेज गावच्या पाणीपुरवठा योजनेसाठी ३७ लाख रुपयांची तरतूद केली होती, मात्र योजनेतील पाईपलाईनमध्ये वारंवार बिघाड होऊ लागल्याने पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा गंभीर झाला.

नवीन पाईपलाईन टाकल्यानंतर काही काळातच वारंवार लिकेजच्या घटना घडू लागल्या. गेल्या आठवडाभरात तर सातत्याने पाईपलाईन फुटण्याच्या घटना घडल्याने पाणीपुरवठा विभागातील कर्मचारीही अक्षरशः हैराण झाले होते. विशेषतः आयओसीच्या आतील बाजूने टाकण्यात आलेल्या पाईपलाईन परिसरात मोठ्या प्रमाणात गवत, दलदल आणि प्रतिकूल परिस्थिती असल्याने लिकेजचे ठिकाण शोधणे आणि ते दुरूस्त करणे मोठे आव्हान ठरत होते.

या अडचणींवर मात करत पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांनी अखेर लिकेजचा शोध घेतला. वासरंग-लवजी रस्त्यावरील आयओसी पुलाजवळ लिकेजचे ठिकाण सापडले. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी रात्रभर युद्धपातळीवर काम करून पहाटेपर्यंत दुरूस्ती पूर्ण केली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे बुधवारी पहाटे पाच वाजल्यापासून लव्हेज गावचा पाणीपुरवठा पूर्ववत झाला.

पाणीपुरवठा सुरळीत झाल्याने ग्रामस्थांनी पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत, मात्र लिकेज दुरुस्त झाले असले तरी भविष्यात पुन्हा पाणीपुरवठा खंडित होऊ नये यासाठी पालिका प्रशासनाने पाईपलाईनची नियमित पाहणी व देखभाल करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### ठेकेदारावर कारवाईची मागणी

***दरम्यान, निकृष्ट दर्जाचे पाईप पुरविल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत पालिका प्रशासनाला लेखी पत्रही देण्यात आले आहे. या प्रकरणाची दखल घेत मुख्याधिकारी पंकज पाटील यांनी पाणीपुरवठा विभागाचे अविनाश भोईर यांना संबंधित ठेकेदाराला नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता संबंधित ठेकेदारावर नेमकी कोणती कारवाई केली जाते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.***

# मूकबधीर सुनेवर अत्याचार; नराधम सासऱ्याला अटक

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाथरज येथील नागेवाडी परिसरात मूकबधीर असलेल्या २३ वर्षीय विवाहित महिलेवर तिच्याच सासऱ्याने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून नेरळ पोलीस ठाण्यात ५० वर्षीय सासऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ३ ऑगस्ट रोजी दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास नेरळ परिसरात हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. पीडितेला तिच्या माहेरी सोडण्यासाठी सासरा कार घेऊन नेरळ येथे आला होता, मात्र माहेरी सोडण्याऐवजी त्याने तिला नेरळ-कशेळे राज्य मार्गावरील सुप्रिया लॉज येथे नेले आणि तेथे जबरदस्ती केल्याचा आरोप पीडितेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत केला आहे.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रकरणाची नोंद करून तपासाला सुरुवात केली असून आरोपी सासऱ्याला अटक करण्यात आली आहे. तक्रारीतील आरोपांची पडताळणी तसेच घटनेशी संबंधित विविध बाबींचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.



**पाली : येथील शिवसेनेचे राजेंद्र मनोहर राऊत यांची पक्षाच्या रायगड जिल्हा संघटकपदी निवड करण्यात आली आहे. याबद्दल पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राऊत यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

# माथेरानमध्ये विद्यार्थ्यांना शिबिराद्वारे मार्गदर्शन

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहर भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष सुभाष भोसले यांनी आपला मुलगा सर्वेश याच्या वाढदिवसानिमित्त येथील नगरपालिका प्राथमिक शाळेत शालेय विद्यार्थ्यांना या आधुनिक काळात सध्यास्थितीत सुरू असलेल्या घडामोडी; त्याचप्रमाणे जीवनात वावरताना विद्यार्थ्यांना आगामी काळात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांचा कशा पद्धतीने निपटारा करायचा याबाबत मार्गदर्शन देणारे शिबिर आयोजित केले होते.



हार्मोनि फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरास शिक्षण सभापती सुनील शिंदे, नगरसेवक केतन रामाणे, नगरसेविका प्रतिभा घावरे, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप अहिरे, शिक्षक संघपाल वाठोरे यांच्यासह कार्यक्रमाचे आयोजक तथा भाजप शहर उपाध्यक्ष सुभाष भोसले आणि अन्य मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

सध्याच्या परिस्थितीत अल्पवयीन मुलींवर अत्याचार होण्याच्या घटना वाढत चाललेल्या आहेत. त्याचप्रमाणे शारीरिक आजार असोत किंवा वयात येताना होणारे शारीरिक बदल तसेच एखाद्या अनोळखी व्यक्तीने केलेले गुड टच, बॅड टच कसे ओळखावे, मासिक पाळी व्यवस्थापन, वैयक्तिक सुरक्षा, स्वच्छता, आरोग्याबाबत काळजी घेताना काय काय उपाययोजना कराव्या याबाबत या शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरास शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागोठण्यात दहीहंडी सोहळा

**नागोठणे : बातमीदार**

श्री. किशोरभाई जैन मित्र मंडळाच्या वतीने यंदाचा १६वा भव्य दहीहंडी उत्सव ५ सप्टेंबर २०२६ रोजी नागोठणे येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष ॲड. रमेश जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सकाळी दहीहंडी पूजन झाल्यानंतर दुपारी २ ते रात्री ८ वाजेपर्यंत गोविंदा पथकांकडून पाच थरांची सलामी देण्यात येईल. सलामी देणाऱ्या प्रत्येक ग्रुपला दोन हजार ५२५ रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. रात्री ८ वाजता दहीहंडी फोडण्यात अंतिम कार्यक्रम होणार असू, दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकाला ५५ हजार ५५५ रुपये रोख व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे.या पत्रकार परिषदेला समितीचे कार्यवाह धनंजय जगताप, जितेंद्र जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# मुरूडमध्ये बँकेला आग

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहराच्या अगदी मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्राच्या वरच्या मजल्यावर बुधवारी (दि.२६) सकाळी शॉकसर्किटमुळे आग लागली. नगर परिषदेच्या अग्निशामक दलाने वरच्या मजल्यावरील दरवाजा फोडून आत प्रवेश करीत तातडीने आग विझवली.

सकाळी साडेदहा ते अकराच्या सुमारास शॉकसर्किटमुळे आग लागून स्टेशनरीच्या कागदांनी पेट घेतला. वरच्या मजल्यावरून अचानक धूर येऊ लागल्याने बाजूलाच हॉटेलमध्ये असणाऱ्या ग्राहकांनी याबाबत नगर परिषदेस कळविले. तातडीची मदत मिळाल्यामुळे आग वेळीच आटोक्यात आली, मात्र जुनी कागदपत्रे, पैसे मोजण्याची मशीन, जुने संगणक आदी जळून खाक झाले आहेत.




# सराई येथे रस्त्याचे नूतनीकरण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल ग्रामपंचायत हद्दीतील सराई येथे गणपती विसर्जन घाटाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या नूतनीकरणाच्या कामाचा भूमिपूजन सोहळा नुकताच पार पडला. जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ यांच्या स्वनिधीतून हे काम करण्यात येत आहे.

भूमिपूजन कार्यक्रमाला जि.प. सदस्य डॉ. राऊळ यांच्यासह पंचायत समिती सदस्य अंकिता घरत, वरंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुधीर चेरकर, शिवसेना चौल पंचायत समिती गणप्रमुख प्रशांत प्रदीप शेवणईकर, शाखाप्रमुख सिद्धेश शेणवईकर, महिला संघटिका तनुजा घरत, निखिल राऊत, संदीप काटकर, नरेंद्र भोईर, योगेश शेळके, प्रवीण शेळके आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या रस्त्याचे काँक्रिटीकरण झाल्यामुळे गणपती विसर्जनाच्या काळात भाविकांना सुविधा मिळणार असून एरवीही या मार्गाचा वापर करणाऱ्या नागरिकांनाही त्याचा फायदा होणार आहे.



# तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत भगत

**रोहा : प्रतिनिधी**

वाशी ग्रामपंचायत हद्दीतील वाशी, महादेववाडी, लांढर व कारिवणे या चार गावांमध्ये सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकोपा अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून ग्रामपंचायत तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे चंद्रकांत भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



वाशी ग्रामपंचायतीच्या सरपंच वंदना वरगुडे, उपसरपंचअरविंद मगर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ही निवड पार पडली. यावेळी ग्रामसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग हंबीर, अंतोष शिर्के, दिपाली धामणसे, हरिश्चंद्र मोरे, संदेश बामणे, नरेश कोकरे आदी उपस्थित होते. चारही गावांतील नागरिकांमध्ये संवाद वाढवून छोटे-मोठे वाद सामोपचाराने सोडविण्यास प्राधान्य देणार आहे, असे नवनिर्वाचित अध्यक्ष भगत यांनी सांगितले.

# मजगाव मराठी शाळेत विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

मजगाव मराठी शाळेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रितम पाटील यांच्या वतीने वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मिथुन भोईर, उपाध्यक्ष केतन नाक्ती, सदस्य योगेंद्र गोयजी, चेतन चव्हाण उपस्थित होते.

भविष्यातही शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्याचा मानस यावेळी प्रितम पाटील यांनी व्यक्त केला, तर मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी समाजातील गोरगरीब शालेय विद्यार्थ्यांना पाटील यांनी मदत केल्याबद्दल ऋण व्यक्त केले.



# नारळफोडी स्पर्धेत महेश कीर प्रथम



**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्री काळभैरव मित्र मंडळ, चौल-बेलाई यांच्या वतीने आयोजित गडगडी नारळफोडी स्पर्धा काळभैरव मंदिर प्रांगणात उत्साहात पार पडली. या स्पर्धेला ग्रामस्थ आणि नारळफोडीप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत महेश कीर यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना १६ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. सन्मेष नाईक यांनी द्वितीय क्रमांक मिळवत आठ हजार रुपये व चषक, तर अजित वर्तक यांनी तृतीय क्रमांक मिळवत चार हजार रुपये व चषक प्राप्त केला.

स्पर्धेदरम्यान विशेष कौशल्य व अचूकता दाखविल्याबद्दल रोहन पाटील यांची उत्कृष्ट मारेकरी म्हणून निवड करण्यात आली, तर कुणाल घरत यांच्या संघाला शिस्तबद्धेचा पुरस्कार देण्यात आला.

# ईद साजरी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तुपगाव येथे ईद-ए-मिलाद-हा सण मोठ्या उत्साहात मुस्लिम बांधवांनी साजरा केला. हा दिवस पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्माच्या स्मृतीनिमित्त साजरा केला जातो.

तुपगाव येथील जामा मस्जिदमध्ये मुस्लिम बांधवांनी विशेष इबादत आणि कुराण पठण केले. या निमित्ताने धार्मिक सभा आणि मोहल्ल्यात येथे मिरवणूक काढण्यात आली, यात आबालवृध्दांनी सहभाग घेतला. या निमित्ताने गरजूंना मदत करण्यात आली. यावेळी खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप रायान्ना यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# अंतोरे येथे वर्षावास मालिका

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा पेण तालुका शाखेच्या वतीने अंतोरे येथे वर्षावास मालिकेचे सहावे पुष्प राजेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

यावेळी द सिम्बॉल ऑफ द नॉलेज या विषयावर केंद्रीय बौद्धाचार्य ॲड. दीपक कांबळे यांनी मार्गदर्शन केले. 'भारतासह परदेशातही आज कित्येक वर्षे लोटत चाललीत, मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाची उंची कधीच कोणालाही मोजता येणार नाही', असे त्यांनी सांगितले.

बौद्ध महासभेच्या वतीने गावोगावी वर्षावास मालिकेचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असताना आपण तथागत भगवान गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अंगीकृत केले पाहिजे, असे पोलीस अधिकारी सोनवणे यांनी सांगितले.

कार्यक्रमास वंचितचे तालुकाध्यक्ष सुनील धामणकर, बौद्धजन पंचायत समितीचे गंगाराम गायकवाड, रोडे पोलीस पाटील सुरेश सोनवणे, नरेश गायकवाड, सचिन कांबळे, कृष्णा गायकवाड, अनंत जोशी, भास्कर कांबळे, रघुनाथ गायकवाड, प्रसाद अडसुळे, रेश्मा जाधव, शशिकला गायकवाड, मानसी कांबळे, रोहीणी अडसुळे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.



# भारताचा श्रीलंकेवर फॉलऑन

## दुसऱ्या डावात यजमानांच्या ६ बाद २२९ धावा

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात पुन्हा एकदा पावसाने बॅटिंग सुरू केली अन् चौथ्या दिवसाचा खेळ लवकर थांबवण्याची वेळ आली. फॉलोऑन मिळाल्यानंतर यजमान श्रीलंकेने चौथ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात ६ बाद २२९ धावा केल्या असून भारताविरुद्ध त्यांच्याकडे १६ धावांची आघाडी आहे.

भारतीय संघाने चौथ्या दिवशी पहिल्या सत्रातच श्रीलंकेचा पहिला डाव २९० धावांत आटोपला. २१३ धावांची आघाडी घेत शुभमन गिलने यजमानांना फॉलोऑन दिला, मात्र श्रीलंकेकडून कामिंदू मेंडिसच्या ५५ धावांच्या उपयुक्त खेळीसह पसिंदू सूरियाबंदराने ९२ धावांची दमदार खेळी करत सामन्यात नवा ट्विस्ट आणला. भारतीय संघ हा सामना चौथ्याच दिवशी निकाली लावेल, असे वाटत असताना आता सामना पाचव्या दिवसावर पोहचला आहे. अखेरच्या दिवशी सोनल दिनुशासह श्रीलंकेची अखेरची फळी आणि पावसाचा व्यत्यय हे भारताच्या विजयाच्या मार्गातील महत्त्वाचे घटक ठरणार आहेत.




चौथ्या दिवशी श्रीलंकेच्या दुसऱ्या डावात मोहम्मद सिराजने लाहिरू उदाराची विकेट घेत टीम इंडियाला पहिले यश मिळवून दिले. तो अवघ्या तीन धावा करून माघारी परतला. त्यानंतर रवींद्र जडेजाने कामिल मिशाराला ३२ धावांवर बाद करत श्रीलंकेला अडचणीत आणले, मात्र त्यानंतर पसिंदू सूरियाबंदरा आणि कामिंदू मेंडिसची जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ११५ धावांची भागीदारी रचत भारतीय गोलंदाजांना चांगलेच सतावले. अखेर प्रसिद्ध कृष्णाने ही जोडी फोडली आणि कामिंदू मेंडिसला ५५ धावांवर माघारी धाडले.

यानंतर मानव सुथारने निर्णायक भूमिका बजावत श्रीलंकेचा कर्णधार धनंजया डी सिल्वा आणि शतकाच्या जवळ पोहचलेला पसिंदू सूरियाबंदरा यांना बाद केले. सूरियाबंदराची दमदार खेळी ९२ धावांवर संपुष्टात आली. यानंतर सारांश जैनने निरोशन डिक्वेलाची विकेट घेत भारताला सहावे यश मिळवून दिले.

चौथ्या दिवसाचा खेळ पावसामुळे लवकर थांबला तेव्हा सोनल दिनुशा सात धावांवर, तर केशरा नुवांथा तीन धावांवर नाबाद होते. श्रीलंका ६ बाद २२९ धावांवर असून भारताविरुद्ध त्यांच्याकडे १६ धावांची आघाडी आहे.

## नॉर्थ झोनचा संघ दुलिप ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दुलीप ट्रॉफीत नॉर्थ झोनचा डावखुरा फिरकीपटू अबिद मुश्ताकच्या भेदक गोलंदाजीसमोर वेस्ट झोनच्या फलंदाजांनी अक्षरशः गुडघे टेकले. वेस्ट झोनच्या मजबूत फलंदाजीला आपल्या फिरकीच्या जाळ्यात ओढत अबिदने संपूर्ण सामन्यात तब्बल नऊ विकेट्स टिपले. अबिद मुश्ताकच्या मॅच-विनिंग कामगिरीच्या बळावर नॉर्थ झोनने उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला असून त्याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

सामन्याच्या चौथ्या दिवशी वेस्ट झोनला विजयासाठी ६७ धावांची गरज होती आणि त्यांच्या हातात तीन विकेट्स शिल्लक होत्या. खेळपट्टीवरून फिरकीपटूंना मिळणाऱ्या टर्नचा अबिदने अचूक फायदा घेतला. दिवसाच्या सुरुवातीलाच त्याने वेस्ट झोनचा अनुभवी फलंदाज तनुष कोटियनला आऊट करून



सामन्यात एका वेळी ऋतुराज गायकवाड (६६ धावा) आणि मुशीर खान (९६ धावा) यांच्या १११ धावांच्या भागीदारीमुळे वेस्ट झोन २८७ धावांचे लक्ष्य सहज गाठेल असे वाटत होते, मात्र गायकवाड रनआऊट झाल्यानंतर अबिद मुश्ताक

### अबिद मुश्ताकच्या नऊ विकेट्स

या सामन्यात अबिद मुश्ताक नॉर्थ झोनसाठी सर्वात मोठा तारणहार ठरला. त्याने पहिल्या डावात उल्लेखनीय गोलंदाजी करत पाच फलंदाजांना तंबूत धाडले. त्यानंतर दुसऱ्या डावातही आपली लय कायम ठेवत त्याने चार महत्त्वाच्या विकेट्स घेतले. दोन्ही डावांत मिळून नऊ विकेट्स घेत त्याने वेस्ट झोनच्या विजयाचे स्वप्न धुळीस मिळवले.

प्रतिस्पर्ध्यांचे कंबरडे मोडले. त्यानंतर झुंज देणाऱ्या तुषार देशपांडेलाही मुश्ताकने आपल्या फिरकीवर चकवून आउट केले. मुश्ताकने तयार केलेल्या या दबावामुळेच अखेर निशांत सिंधूने उर्विल पटेलला बाद करत वेस्ट झोनचा २३४ धावांवर ऑलआऊट केला.

आणि नॉर्थ झोनच्या फिरकीपटूंनी सामन्याचे चित्र पूर्णपणे पालटून टाकले. सात षटकांत वेस्ट झोनच्या चार विकेट्स काढून त्यांनी वेस्टला बॅकफूटवर ढकलले. अबिद मुश्ताकच्या आक्रमक गोलंदाजीच्या जोरावर नॉर्थ झोनने हा सामना ५२ धावांनी जिंकला.

## आयसीसी कसोटी क्रमवारीत मिचेल स्टार्क अव्वल स्थानी



**दुबई : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेला मुकलेल्या जसप्रीत बुमराहला आयसीसी क्रमवारीत मोठा फटका बसला आहे. बांगलादेशविरुद्धच्या मालिकेतील दमदार कामगिरीच्या जोरावर मिचेल स्टार्कने बुमराहला मागे टाकत अव्वल स्थानावर झेप घेतली आहे.

बांगलादेशविरुद्ध नुकत्याच झालेल्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत स्टार्कने शानदार गोलंदाजी केली होती. त्याचा फायदा त्याला क्रमवारीत झाला आहे. स्टार्क आता ८७२ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानावर आहे. त्याने दोन स्थानांची झेप घेत भारतीय गोलंदाजाला मागे टाकले. जसप्रीत बुमराहला एका स्थानाचा फटका बसला असून तो ८६२ रेटिंग गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर घसरला आहे.

बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात स्टार्कला केवळ दोन विकेट मिळाल्या होत्या आणि ऑस्ट्रेलियाला या सामन्यात पराभव पत्करावा लागला होता. दुसऱ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाने दमदार पुनरागमन केले. स्टार्कने पहिल्या सहा, तर दुसऱ्या डावात चार विकेट मिळवल्या. सामन्यात एकूण १० विकेट घेत स्टार्कने ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट सामन्यांचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली** : जपानमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६साठी क्रिकेट सामन्यांचे अधिकृत वेळापत्रक आणि भारतीय संघांची घोषणा करण्यात आली आहे. सर्व सामने आयची प्रांतातील कोरोगी ॲथलेटिक पाक' या एकाच मैदानावर खेळवले जातील.

पुरुषांची स्पर्धा गट 'अ' आणि गट 'ब'मध्ये विभागली असून आयसीसी टी-२० रँकिंगनुसार अव्वल चार संघांना थेट नॉकआउट फेरीत स्थान देण्यात आले. भारतीय पुरुष संघ २८ सप्टेंबर रोजी गट 'अ'मधील दुसऱ्या क्रमांकावरील संघाविरुद्ध मैदानात उतरेल. दुसरीकडे महिलांच्या स्पर्धेत एकूण आठ संघ बाद फेरीत आमनेसामने येतील. विजयी संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. भारतीय महिला संघ आपल्या मोहिमेची सुरुवात १८ सप्टेंबर रोजी जपानविरुद्धच्या सामन्याने करेल. कॉमनवेल्थ गेम्स २०२६मधील यशस्वी कामगिरीनंतर आता आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारतीय क्रिकेट संघांकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## युरोपियन टी-२० प्रीमिअर लीग रंगणार

### द्रविड, अश्विनचा सहभाग



**ॲमस्टरडॅम : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या धर्तीवर जगभरात सगळीकडे टी-२० लीगचे पेव फुटले आहे. यात युरोपियन टी-२० प्रीमिअर लीग या आणखी एका लीगची भर पडली आहे. विशेष म्हणजे या लीगमध्ये रविचंद्रन अश्विन खेळाडू आणि मार्गदर्शक अशा दुहेरी भूमिकेत दिसणार आहे, तर भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक राहुल द्रविड या लीगमध्ये संघमालकाच्या भूमिकेत दिसतील.

या नव्या लीगमध्ये ॲमस्टरडॅम फ्लेम्स, बेलफास्ट वोल्व्हज, डब्लिन गार्डियन्स, एडिनबर्ग कॅस्टल रॉकर्स, ग्लासगो कॉसमिक, रॉटरडॅम डॉकर्स असे सहा संघ असणार आहेत. मिचेल मार्शकडे ॲमस्टरडॅम संघाचे नेतृत्व सोपवण्यात आले होते, मात्र ऑस्ट्रेलियासाठी खेळायचे असल्याने त्याने माघार घेतली. त्याच्या अनुपस्थितीत स्कॉट एडवर्ड्स कर्णधार असेल. बेलफास्ट संघाची धुरा ग्लेन मॅक्सलवेलकडे आहे. एडिनबर्ग संघाने न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरकडे कर्णधारपद सोपवले आहे. फाफ डू प्लेसिस रॉटरडॅम संघाचा कर्णधार असेल. ग्लासगो संघाची कमान स्कॉटलंडच्या जॉर्ज मुन्सेकडे असणार आहे.

रविचंद्रन अश्विन डब्लिन संघाचा कर्णधार-मेन्टॉर असणार आहे. तामिळनाडू प्रीमिअर लीग स्पर्धेतही त्याने अशी दुहेरी भूमिका निभावली आहे. याशिवाय राहुल द्रविड (डब्लिन), स्टीव वॉ (ॲमस्टरडॅम) आणि फाफ डू प्लेसिस (रॉटरडॅम) हे सहमालकाच्या भूमिकेत आहेत. अमेरिका, कॅनडा या देशांमध्ये सुरू झालेल्या लीगप्रमाणे ही लीग नेदरलँड्समध्ये नवा प्रेक्षकवर्ग तयार करेल अशी संयोजकांना आशा आहे.

## बॅडमिंटन क्रमवारीत त्रिशा आणि गायत्रीची मोठी झेप



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकत्याच झालेल्या बॅडमिंटन विश्व चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकल्यानंतर भारतीय महिला दुहेरी जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी बीडब्ल्यूएफ जागतिक क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. या भारतीय जोडीने १२ स्थानांची झेप घेतली आहे.

दुखापतीतून पुनरागमन करताना त्रिशा-गायत्री या भारतीय जोडीने कांस्यपदक जिंकल्यानंतर १२ स्थानांची झेप घेत २७वे स्थान पटकावले आहे. त्यांनी या स्पर्धेत महिला दुहेरी पदकासाठी भारताची १५ वर्षांची प्रतीक्षा संपवली आणि २०११पासून प्रत्येक वेळी किमान एक पदक जिंकण्याची त्यांची परंपरा कायम राखली. पुरुष एकेरीमध्ये आयुष शेट्टी अव्वल २०मध्ये दाखल झाला असून आता तो २०व्या क्रमांकावर आहे. लक्ष्य सेन क्रमांक १३वर पोहचला आहे. महिला एकेरीमध्ये पी.व्ही. सिंधूने अव्वल १०मध्ये आपले दहावे स्थान कायम राखले आहे, तर उन्नती हुडा एका स्थानाने वर चढून २५व्या क्रमांकावर पोहचली आहे. तन्वी शर्मा तीन स्थानांनी वर चढून जागतिक क्रमांक २६वर आली आहे. पुरुष दुहेरीमध्ये सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जागतिक क्रमांक ५वर कायम आहेत.

## टीम इंडियाचा डब्ल्यूटीसी फायनलचा मार्ग खडतर -द्रविड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या मते, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (डब्ल्यूटीसी)च्या अंतिम सामन्यासाठी पात्र ठरण्याच्या शर्यतीत भारतीय संघ थोडा मागे आहे आणि न्यूझीलंड दौऱ्यावर श्रीलंकेतील प्रभावी कामगिरीची पुनरावृत्ती करणे कठीण होईल.

दोनदा डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्यात पोहचलेला भारतीय संघ सध्या गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. अंतिम सामन्यात दाखल होण्यासाठी त्यांना आपले उर्वरित बहुतेक सामने जिंकावे लागतील. पुढील वर्षी होणारा अंतिम सामना अव्वल दोन संघांमध्ये खेळला जाईल. जानेवारी २०२७मध्ये मायदेशात ऑस्ट्रेलियाविरुद्ध पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेपूर्वी भारतीय संघ न्यूझीलंडमध्ये दोन कसोटी सामने खेळेल. या दौऱ्यात भारत न्यूझीलंडविरुद्ध पाच एकदिवसीय आणि तितकेच टी-२० सामनेही खेळेल.

द्रविडने सांगितले की, भारत डब्ल्यूटीसीच्या



अंतिम सामन्यात पोहचण्यात यशस्वी होईल अशी त्यांना आशा आहे. सध्याची परिस्थिती असूनही जर भारत अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला, तर ती एक उल्लेखनीय कामगिरी असेल. तो म्हणाला की, भारतीय संघ मागे पडत आहे असे वाटत असले, तरी तो एक खूप मजबूत संघ आहे आणि कोणत्याही स्तरावर त्याला कमी लेखता येणार नाही. त्यांनी श्रीलंकेविरुद्ध चांगली सुरुवात केली. त्यामुळे पहिले पाऊल खूप चांगले आहे.

भारताने श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे आणि फलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे दुसऱ्या कसोटीतही त्यांचे पारडे जड आहे. ऑक्टोबरमधील न्यूझीलंड दौऱ्याबाबत द्रविड म्हणाला की, विराट कोहली आणि चेतेश्वर पुजारा यांसारख्या निवृत्त क्रिकेटपटूंच्या अनुभवाची कमतरता दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये जाणवेल. भारताचे अनेक तरुण क्रिकेटपटू न्यूझीलंडसारख्या परिस्थितीत खेळलेले नाहीत, त्यामुळे हे एक मोठे आव्हान असेल.

### अनुभवी क्रिकेटपटूंची उणीव भासेल

भारताचा माजी कर्णधार व प्रशिक्षक द्रविड म्हणाला की, भारतीय क्रिकेटपटू न्यूझीलंड दौऱ्यासाठी पूर्णपणे तंदुरूस्त असतील अशी आशा असली, तरी त्यांना विराट कोहली, रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे आणि चेतेश्वर पुजारा यांसारख्या अनुभवी क्रिकेटपटूंची उणीव भासेल. न्यूझीलंडविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर खेळणे हे नेहमीच एक आव्हान असते. ऑस्ट्रेलियाविरुद्धची मायदेशातील मालिकाही सोपी असणार नाही.

## इंग्लंडच्या खेळाडूंचा 'रात्रीस खेळ चाले...'

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा कसोटी कर्णधार जो रूट याने इंग्लंड क्रिकेटमधील नाईट क्लब प्रकरणावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्सवर तो नाराज आणि निराश आहे. मैदानाबाहेर खेळाडूंकडून वारंवार होणाऱ्या या बेजबाबदार आणि मूर्खपणाच्या कृत्यांमुळे मी वैतागलो आहे, असे रूटने म्हटले आहे.

जो रूटने नुकतीच पुन्हा इंग्लंडच्या कसोटी संघाच्या कर्णधारपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. डर्बी शहरातील एका नाईट क्लबबाहेर घडलेल्या घटनेप्रकरणी खेळाडू ब्रायडन कार्सची सध्या चौकशी सुरू आहे. नाईट क्लबच्या वादानंतर २७ ऑगस्टपासून पाकिस्तानविरुद्ध सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटीच्या संघातून कार्सला वगळण्यात आले आहे. त्याच्या जागी युवा वेगवान गोलंदाज सॉनी बेकरचा संघात समावेश करण्यात आला आहे.

### कर्णधार वैतागला!



सोशल मीडियावर नुकताच एक व्हिडीओ समोर आला होता, ज्यामध्ये ब्रायडन कार्सला पोलिसांनी हातात बेड्या घालून नेताना दिसत होते. त्यानंतर इंग्लंड क्रिकेट बोर्डाने (इसीबी) हे प्रकरण क्रिकेट नियामकाकडे सोपवले असून घटनेची चौकशी सुरू आहे.

पत्रकार परिषदेत जो रूट म्हणाला, मी अगदी स्पष्टपणे सांगतो, या गोष्टीमुळे मी खूप नाराज आणि निराश आहे. गेल्या आठवड्यात संघाने शानदार कामगिरी केल्यानंतर आता आपण अशा गोष्टीवर चर्चा करत आहोत, जिचा क्रिकेटशी काहीही संबंध नाही. रूटने पुढे बोलताना हा प्रश्न केवळ एका घटनेपुरता मर्यादित नसल्याचेही स्पष्ट केले. "खरी समस्या ही आहे की, आपण मैदानाबाहेर वारंवार अशा मूर्खपणाच्या चुका करत आहोत आणि आता मी या प्रकारच्या घटनेंमुळे वैतागलो आहे,"

### 'जेंटलमन्स गेम'ला धक्का

*इंग्लंडच्या खेळाडूंच्या दारू आणि उशिरापर्यंतच्या पार्ट्यांशी संबंधित वादाची ही काही पहिली घटना नाही. याआधी न्यूझीलंडविरुद्ध लॉर्ड्सवर पहिली कसोटी जिंकल्यानंतर माजी कर्णधार बेन स्टोक्स आणि वेगवान गोलंदाज गस एटकिंसन यांच्या नाईट क्लबमधील कथित वादाचे प्रकरण गाजले होते. आता काही दिवसांतच इंग्लंडचा आणखी एक खेळाडू नाईट क्लबमधील वादग्रस्त घटनेमुळे चर्चेत आला आहे. क्रिकेटला 'जेंटलमन्स गेम' म्हटले जाते, मात्र इंग्लंडच्या स्टार खेळाडूंशी संबंधित अशा मैदानाबाहेरील घटनांमुळे या संघाची प्रतिमा नक्कीच चर्चेत आली आहे.*

## अनाया बांगरच्या कमबॅकचा मार्ग मोकळा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनाया बांगरने क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या नियमांनुसार मार्च २०२७पासून एलीट महिला क्रिकेटमध्ये खेळण्यासाठी आपण पात्र असल्याचा दावा अनायाने केला आहे. त्यामुळे भविष्यात तिला ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित महिला बिग बॅश लीग (डब्ल्यूबीबीएल)मध्ये खेळण्याची संधी मिळू शकते.

मुंबईत वयोगटातील क्रिकेट खेळलेल्या अनायाला ट्रान्सजेंडर म्हणून संक्रमणाच्या प्रक्रियेनंतर काही काळ क्रिकेटपासून दूर राहावे लागले होते. त्यामुळे पुन्हा एकदा स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये उतरण्याची शक्यता तिच्यासाठी भावनिकदृष्ट्या महत्त्वाची असल्याचे तिने म्हटले आहे.

आपण पुन्हा क्रिकेट खेळू शकणार असल्याचे समजल्यानंतरचा दिवस आयुष्यातील मोठा दिवस असल्याचे अनायाने सांगितले. एक काळ असा होता की पुन्हा क्रिकेट खेळता येईल की नाही, याबाबतच शंका निर्माण झाली होती, मात्र आता पुन्हा मैदानावर उतरण्याची संधी मिळाल्याबद्दल तिने क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे आभार मानले आहेत.

अनायाला क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या एलीट क्रिकेटमध्ये ट्रान्सजेंडर खेळाडूंच्या समावेशाच्या धोरणांतर्गत पात्रता मिळाल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियातील महिला क्रिकेटमध्ये खेळण्याचा मार्ग तिच्यासाठी खुला झाला आहे, मात्र पात्रता मिळणे म्हणजे डब्ल्यूबीबीएल फ्रँचायझीकडून थेट करार मिळण्याची हमी नाही. त्यामुळे अनायासमोर आता स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये स्वतःची क्षमता सिद्ध करण्याचे आव्हान असेल.

## डीपीएलमध्ये देव चौधरी ट्रोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सध्या सुरू असलेल्या दिल्ली प्रीमियर लीगदरम्यान देव चौधरी या क्रिकेटपटूला प्रचंड ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. सुमार कामगिरी आणि विचित्र बॅटिंग स्टाईलमुळे क्रिकेटप्रेमी सोशल मीडियावरून त्याच्यावर बेछूट टीका करत आहेत.



देव चौधरी हा न्यू दिल्ली टायगर्स संघाकडून खेळत आहे. त्याच्या फलंदाजीची शैली आणि क्षेत्ररक्षण करण्याची पद्धत थोडी विचित्र आहे. सामन्यापूर्वी क्षेत्ररक्षणाचा सराव करताना त्याच्या हातून साधे सोपे झेल सुटत असल्याचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे. विचित्र स्टाईलमध्ये फलंदाजी करणारा चौधरी स्पर्धेतील आपल्या पहिल्याच सामन्यात शून्यावर बाद झाला होता, तर दुसऱ्या सामन्यात त्याने २४ चेंडूत १६ धावा काढल्या होत्या. या सुमार कामगिरीमुळे त्याला संघातून बाहेरची वाट दाखवण्यात आली आहे.

दरम्यान, देव चौधरीच्या संघात झालेल्या निवडीवर क्रिकेटप्रेमींकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. चौधरी हा ऑक्शनचा भागच नव्हता,असा दावाही काही जणांकडून केला जात आहे, तर काहींच्या दाव्यानुसार त्याला एक लाख रुपयांना खरेदी करण्यात आले होते.

## दिनेश कार्तिकला सीएसकेचा मुख्य प्रशिक्षक करा -मॅथ्यू हेडन

**सिडनी : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२७ स्पर्धेआधी चेन्नई सुपर किंग्स संघाला मोठा धक्का बसला आहे. अनुभवी मुख्य प्रशिक्षक स्टिफन फ्लेमिंग यांनी मुख्य प्रशिक्षकपद सोडण्याचा निर्णय घेतला. फ्लेमिंगची जागा कोण घेणार? याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मायकल हसी किंवा इओन मॉर्गन त्याची जागा घेऊ शकतो, अशी चर्चा रंगली आहे, पण सीएसकेचा माजी खेळाडू मॅथ्यू हेडनने वेगळा सल्ला देत एका स्टार खेळाडूचं नाव सुचवले आहे.

स्पोर्टस्टारला दिलेल्या मुलाखतीत बोलताना, मॅथ्यू हेडनला चेन्नई सुपर किंग्सचा पुढील मुख्य प्रशिक्षक कोण व्हावा? असा प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नाचे उत्तर देताना हेडन म्हणाला की, मुख्य प्रशिक्षकासाठी काही नावांचा उल्लेख करण्यात आला होता. त्यापैकी दिनेश कार्तिक एक होता. माझ्या मते, कार्तिक ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आता पूर्णपणे तयार आहे. मला तरी हेच वाटते की, स्थानिक मुख्य प्रशिक्षक असणे गरजेचे आहे. कुठल्याही फ्रँचायझीला परदेशी प्रशिक्षक हवा असतो, पण सीएसकेने असे करू नये.




हेडन पुढे म्हणाला की, मला खात्री आहे की, चेन्नई सुपर किंग्स टीम मॅनेजनेंट विचार करुन योग्य निर्णय घेईल. फ्लेमिंगने धोनीसोबत मिळून जबरदस्त कामगिरी केली होती. दोघांनी मिळून मजबूत संघबांधणी केली होती. आता चेन्नईचा पुढील मुख्य प्रशिक्षक कोण होणार हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे.

चेन्नई सुपर किंग्सचा संघ आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघांपैकी एक आहे. महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वात या संघाने पाच वेळा जेतेपदाची ट्रॉफी उंचावली आहे, पण धोनीने कर्णधारपदावरुन माघार घेतल्यानंतर या संघाला जेतेपदाची एकही ट्रॉफी उंचावता आलेली नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com